रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८८ ▌अंक २२ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. २८ जून २०२४

किंमत ४ ₹


## 'नीट'प्रकरणी सीबीआयची कारवाई

**पाटणा :** नीट पेपर लीक प्रकरणामध्ये सीबीआयने गुरुवारी मनीष प्रकाश आणि आशुतोष कुमार या दोघांना अटक केली. मनीषला चौकशीसाठी बोलावण्यात आलेलं होतं, त्यानंतर त्याला अटक केली. दुसरीकडे सीबीआयने दोन आरोपी चिंटू आणि मुकेशला रिमांडमध्ये घेतलं आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार मानला जाणाऱ्या संजीव कुमार मुखिया हा उत्तर प्रदेश कॉन्स्टेबल भरती परीक्षेसह पाच प्रमुख पेपर लीक प्रकरणांमध्ये सहभागी होता, अशी माहिती आहे. संजीव मुखिया देशातील विविध परीक्षांमध्ये ब्ल्यूटूथ उपकरणांचा वापर करुन पेपर फोडण्याचे काम करायचा, असे तपासात समोर आले आहे.

## मानवी हक्क आयोग जिल्हा दौऱ्यावर

**रायगड :** महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग जिल्हा दौऱ्यावर येत आहे. २८ व २९ जून या दोन दिवसात जिल्ह्यातील विविध ठिकाणी ते भेट देणार आहेत, असे आयोगाचे सचिव नितीन पाटील यांनी सांगितले. या दौऱ्यात २८ जून रोजी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, जिल्हाधिकारी कार्यालय आदी ठिकाणी भेट देतील तसेच वरिष्ठ प्रशासकीय व पोलीस अधिकाऱ्यांबरोबर मानव अधिकार संरक्षणसंदर्भात आढावा घेणार आहेत. तसेच कर्नाळा येथील युसुफ मेहर अली सेंटर येथे भेट देऊन स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी बरोबर चर्चा करतील.

**आजचा अग्रलेख**
**याला म्हणतात थप्पड**

**वे|ध|क**

### आज राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प

**मुंबई :** राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशनास गुरुवारी २७ जून सुरुवात झाली असून, ते शुक्रवार १२ जुलैपर्यंत चालणार आहे. राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प २८ जून रोजी अर्थमंत्री अजित पवार मांडणार आहेत. विधानभवनात झालेल्या विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीला विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आदी मान्यवर उपस्थित होते.

### ज्येष्ठांवर होणार मोफत उपचार

**नवी दिल्ली :** १८ व्या लोकसभेला संबोधित करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी वयस्कर लोकांसाठी एक खुशखबर दिली आहे. ७० वर्षांपुढील सर्व व्यक्तींचा आयुष्यमान योजनेंतर्गत मोफत उपचार होणार आहे. द्रौपदी मुर्मू यांनी सांगितलं की, नव्या सरकारमध्ये ७० वर्षांच्या पुढील वयाच्या सर्व व्यक्तींना आयुष्यमान भारत योजनेचा फायदा होणार आहे. त्यांच्यावर मोफत उपचार केले जातील. आयुष्यमान भारत योजनेचा विस्तार करण्यात करण्यात येणार असून, त्यात आता वृद्ध व्यक्तींचा समावेश करण्यात येणार आहे. त्यांना मोफत आणि चांगली आरोग्य सुविधा पुरवण्यात येणार आहे.

# विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ

## पोषण आहारात सापडल्या उंदराच्या लेंड्या, पक्ष्यांची पिसे

**। पेण । प्रतिनिधी ।**

**शाळांमध्ये मुलांची उपस्थिती असणे, त्यांना चांगले शिक्षण आणि पोषक आहार मिळावा या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या शालेय पोषण आहारातील तांदळात पक्ष्यांची पिसे, अळ्या अन् उंदराच्या लेंढ्या आढळून आल्या. शाळकरी मुलांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहारातील ही धक्कादायक बाब बघून पालकांच्या पायाखालची जमीन सरकली आहे. याबाबतची माहिती देण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य अधिकारी बास्टेवाड यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी मी मिटींगमध्ये असल्याचा मॅसेज करीत बोलणे टाळले. विद्यार्थ्यांच्या आरोग्यापेक्षा अधिकाऱ्यांना बैठका महत्त्वाच्या वाटत असल्याने पालकांमधून संताप व्यक्त होत आहे.**



शासन नियमानुसार मध्यान्ह भोजन आहार ही योजना गेली कित्येक वर्षे सुरू आहे. मात्र, मधल्या काळात या योजनेमध्ये अनेक फेरबदल झाले. आणि धान्यपुरवठा •› पान २ वर

### सीईओंनी बोलणे टाळले

निकृष्ट धान्याबाबत रायगड जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांना भ्रमणध्वनीवरून संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी फोन उचलला नाही. मात्र, एक टेक्स मेसेज पाठवला की, माफ करा, मी आता बोलू शकत नाही. अधिकारीवर्गाला विद्यार्थ्यांच्या आरोग्यापेक्षा त्यांच्या बैठका महत्त्वाच्या वाटतात. याबाबत पालकवर्गातून चीड व्यक्त होत आहे.

### खरंच असा आहार पोषण ठरेल?

वटाणा मुगाएवढाच लहान-लहान तर, चवळी, हरभऱ्यात पाखरे पडलीत. मुगडाळ, तुरडाळ, मसुरडाळीमध्ये डाळ कमी भुसा व कडधान्यांची टरफले जास्त, मिरची पावडरची अवस्था तर दयनीयच, हळद पिवळी नसून राखाडी रंगाचीच, गरम मसाला म्हसणे चॉकलेटी कलरची भुकटी, जिरे, मोहरी, मिठाची अवस्थाही न बोलण्यासारखीच. तांदळाच्या पोत्यात पक्ष्यांची पिसे, उंदरांच्या लेंढ्या आढळून आल्या आहेत.



# आवासमध्ये कांदळवनाची खुलेआम कत्तल

## महसूल विभागासह कांदळवन विभागाचे दुर्लक्ष

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

हवामान बदलाचा सामना करण्याबरोबरच माशांच्या अनेक प्रजातींच्या प्रजननासाठी कांदळवन महत्त्वाचे ठरत आहे. त्यामुळे कांदळवन संरक्षणासाठी शासनाकडून पावले उचलण्यात आली आहेत. मात्र, अलिबाग तालुक्यात अनेक भागात कांदळवनांची कत्तल होत आहे. त्यामध्ये आवास खाडीकिनारी धनदांडग्यांकडून खुलेआमपणे कांदळवनांची कत्तल करण्यात आली आहे.

मात्र, याकडे महसूल विभागासह वन विभागाने दुर्लक्ष केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र कवळे यांनी केला आहे. अलिबाग •› पान २ वर

> **"कांदळवनाच्या संरक्षणासाठी यंत्रणा तयार केली आहे. स्थानिक पातळीसह तालुका जिल्हा पातळीर समितीदेखील गठीत केली आहे. कांदळवन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाते. कांदळवनांची कत्तल करणाऱ्यांविरोधात तक्रार आल्यास तातडीने त्यांच्याविरोधात कारवाई केली जाईल. – समीर शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी, कांदळवन संरक्षक विभाग"**

# विरार-अलिबाग बहुउद्देशीय प्रकल्पाला हुडकोचा 'डोस'

## कोकणच्या विकासाला नवीन आयाम मिळणार

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

विरार ते अलिबाग या बहुउद्देशीय प्रकल्पाच्या भूसंपादनाला आता वेग येणार आहे. सरकारने तब्बल २२ हजार २५० कोटी रुपये 'हुडको'कडून कर्जरूपाने घेण्यास मान्यता दिली आहे. मंत्रिमंडळाच्या बुधवारच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याने प्रकल्पाला गती येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) विरार ते अलिबागदरम्यान १२८ किलोमीटर लांबीचा मार्ग उभारणार आहे. मुंबई महानगर प्रदेशातील पालघर, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांच्या विकासाला नवीन



आयाम प्राप्त होणार आहेत.

एमएसआरडीसी मागणीनुसार, या कर्जासाठी शासन हमी देण्यात येणार आहे. एकूण एक हजार १३० हेक्टर जमिनीचे भूसंपादन करायचे आहे. यासाठी एकूण २१५.८० हेक्टर जमिनीचे भूसंपादन झाले आहे. या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी दोन हजार ३४१ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे. एमएसआरडीसीला •› पान २ वर

### कसा असेल विरार-अलिबाग प्रकल्प

या प्रकल्पात आठ इंटरचेंज, २८ वाहन अंडरपास, १६ पादचारी अंडरपास आणि १२० कल्व्हर्ट असतील. संपूर्ण मार्ग आठपदरी असून, त्यासाठी २१ उड्डाणपूल, पाच टनेल, ४० मोठे आणि ३२ छोटे पूल प्रस्तावित आहेत. हा मार्ग पूर्ण झाल्यावर परिसरातील ग्रोथ सेंटर, एमआयडीसी आणि वसई-विरार, ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, नवी मुंबई, उरण-पनवेल या महानगरांसह जवाहरलाल नेहरू पोर्ट, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास त्याचा मोठा लाभ होणार असून, येथील प्रवासी आणि अवजड वाहतूक वेगवान होण्यास मदत होणार आहे. या मार्गाच्या मधोमध १३६ कि.मी. लांबीची मेट्रो मार्गिका उभारण्याचेही प्रस्तावित आहे.

### प्रकल्पावर दृष्टीक्षेप

| | |
|---|---|
| एकूण खर्च – | ५५,००० कोटी |
| भूसंपादनासाठी येणारा खर्च – | २२,००० कोटी |
| प्रत्यक्ष बांधकामाचा खर्च – | १९,००० कोटी |
| आस्थापनांवरील खर्च – | १४,००० कोटी |

# झुलता पूल निधीअभावी लटकला

## महाविकास आघाडीच्या निधीला महायुतीची कात्री

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील पर्यटनासाठी विशेष निधीची तरतूद महाविकास आघाडी सरकारने केली असताना नव्याने प्रस्थापित झालेल्या महायुती सरकारने या निधीला कात्री लावल्याने या पर्यटन स्थळांचा विकास अधांतरीच लटकला आहे.



(छायाचित्र : शैलेश पालकर)

पोलादपूरच्या वर्षापर्यटनाचे विशेष आकर्षण असलेला वाकण गोपाळवाडी ते घागरकोंड येथील झुलता पूल २०२१ मध्ये अतिवृष्टीदरम्यान वाहून गेला. परिणामी, वर्षापर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या पोलादपूर तालुक्यात गेल्या दोन वर्षांप्रमाणे यंदाही वर्षापर्यटनासाठी गर्दी होण्याची शक्यता घटली आहे. झुलत्या पुलाच्या पुनर्बांधणीसाठी महायुती सरकारमध्ये असलेल्या मंत्री अदिती तटकरे आणि आ. गोगावले यांनी पुन्हा पर्यटन विशेष निधी उपलब्ध करून झुलत्या पुलाच्या लटकलेल्या प्रस्तावावर एकजुटीने प्रयत्न करण्याची गरज आहे.

पोलादपूर तालुक्यातील निसर्ग सौंदर्यसृष्टीचा २०२१च्या अतिवृष्टी, महापूर आणि भूस्खलनामध्ये ऱ्हास झाल्यानंतर महाविकास आघाडी सरकारच्या काळामध्ये विविध पर्यटन स्थळांच्या विकासकामासाठी पर्यटन विभागातर्फे तब्बल १० कोटी रूपयांचा विकासनिधी आगामी काळात खर्च करण्यास मंजुरी मिळाली. या निधीतून घागरकोंडचा झुलता पूल, साखर येथील नरवीर सुर्याजी मालुसरे समाधी आणि उमरठ येथील •› पान २ वर

### अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी

# विरोधक आक्रमक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन गुरुवारपासून सुरू झाले असून, १४ व्या विधानसभेचे हे शेवटचे अधिवेशन आहे. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून विरोधक आक्रमक झाले होते.

शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे, यासाठी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवन पायऱ्यांवर आंदोलन केले. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला बुधवारी सरकारने दिलेले चहापानाचे निमंत्रण विरोधकांनी नाकारून सरकारविरोधात अधिवेशन सुरू होण्याआधीच शड्डू ठोकला होता. पहिल्याच दिवसापासून विधिमंडळाच्या पायऱ्या आणि दोन्ही सभागृहांत विरोधकांची आक्रमक भूमिका पाहायला मिळाली. लोकसभा निवडणुकीच्या निकालाचे पडसाद या अधिवेशनात जाणवले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विधानभवनात येताच त्यांच्यासमोर विरोधकांनी आक्रमक घोषणाबाजी केली. शेतकऱ्यांची कर्जमाफी झालीच पाहिजे, शेतकऱ्यांची वीजबिल माफ करावी, कृषीमंत्र्यांच्या जिल्ह्यात बळीराजाचा बळी, अशा घोषणा विरोधकांनी दिल्या.



# दादांना महायुतीतून बाहेर काढा

## भाजप पुणे पदाधिकाऱ्यांचा अजितदादांवर हल्ला

**। पुणे । प्रतिनिधी ।**

अजित पवार महायुतीत उशिरा यायला हवे होते, असे विधान करून शिवसेना नेते रामदास कदम यांनी महायुतीमधील बेबनाव समोर आणला. त्यानंतर आता अजित पवार यांचा महायुतीतील सहभाग भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनादेखील खटकायला लागला आहे. भाजपचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष आणि पुणे बाजार समितीचे संचालक सुदर्शन चौधरी यांनी भाजप आमदार राहुल कुल यांच्यासमोरच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार हल्ला चढवला.



ज्या भाजप कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांना अजित पवार यांनी अक्षरशः चिरडले, त्याच अजित पवारांना आमच्या बोकांडी बसवलेय, अशा शब्दात आपला संताप व्यक्त करत अजित पवार असतील तर असली सत्ता आपल्याला नको, अशा टोकाच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. अजित पवार यांनी राहुल कुल, योगेश टिळेकर यांच्यावर अन्याय •› पान २ वर

### अजितदादांना धक्का

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी गुरुवारी (दि. २६) सायंकाळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची विधानभवनातील एका कार्यालयात भेट घेऊन पुढील बोलणी सुरू केली. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा तसेच उत्तर महाराष्ट्रातील जवळपास सहा आमदारांनी जयंत पाटील यांची भेट घेऊन आगामी राजकीय समीकरणांवर चर्चा केली. शरद पवार यांनी फुटीर आमदारांना सोबत घेण्यास हिरवा कंदील दर्शवल्यानंतर इच्छुक आमदारांनीही तातडीने जयंत पाटील यांची भेट घेतली. विधिमंडळ अधिवेशनात निधी पदरात पडल्यानंतर •› पान २ वर

**सहा आमदार जयंत पाटील यांच्या भेटीला**

> **"जयंत पाटील खूपच सिनिअर आणि अनुभवी नेते आहेत. कधी कुठलं कार्ड बाहेर काढायचे हे त्यांना चांगले माहिती आहे. शरद पवार यांच्या जोडीला जयंत पाटील साहेब आहेत, त्यामुळे कार्यक्रम फिक्स होणार आहे. ही तर सुरुवात आहे. आमच्यासोबत १० ते १५ आमदार येतील. – आ. रोहित पवार**

### आठ आमदारांचे राजीनामे मंजूर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विधानसभेचे पावसाळी अधिवेशन गुरूवारपासून सुरू झाले आहे. या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ८ आमदारांचे राजीनामे मंजूर करत असल्याची घोषणा विधानसभेत केली. हे आमदार कोण याची माहितीही त्यांनी विधानसभेला दिली. यात चार आमदार हे काँग्रेसचे आहेत, तर दोन आमदार हे शिवसेना शिंदे गटाचे आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाचा एक आमदार आहे. तर राजू पारवे यांनी काँग्रेस सोडल्यानंतर राजीनामा दिला होता.

आमदार असलेले सात जण लोकसभेवर निवडून गेले आहेत. तर लोकसभा लढवण्यासाठी राजू पारवे यांनी आधीच राजीनामा दिला होता. पण, त्यांचा लोकसभा निवडणुकीत पराभव झाला. काँग्रेसच्या वर्षा गायकवाड, प्रणिती शिंदे, बळवंत वानखडे आणि प्रतिभा धानोरकर •› पान २ वर

### पक्ष्यांचं नंदनवन स्वागतासाठी सज्ज

# तिबोटी खंड्या जागेच्या शोधात

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पावसाची चाहूल घेऊन येणारा तिबोटी खंड्या अगदी वेळेत कर्नाळा पक्षी अभय आरण्यात दाखल झाला आहे. मे महिन्याच्या अखेरीस अभयारण्यात दाखल झालेल्या तिबोटी खंड्याच्या दोन जोड्यांच्या ठिकाणाचा वेध वनविभागाचे अधिकारी घेत आहेत. घरटं बांधण्यायोग्य जागेच्या शोधात हा खंड्या अभयारण्य परिसरात घिरट्या घालत असल्याची शक्यता कर्नाळा पक्षी अभयारण्याचे वनक्षेत्रपाल नारायण राठोड यांनी दिली आहे.

हजारो किलोमीटरचा प्रवास करून तिबोटी खंड्या हा पक्षी दरवर्षी मे महिन्यातच पक्ष्यांचे नंदनवन समजल्या जाणाऱ्या कर्नाळा पक्षी अभयारण्यात दाखल होत असतो. यंदादेखील तो वेळेत दाखल झाला आहे. विणीच्या हंगामाआधी एकमेकांना आकर्षित •› पान २ वर

- **कर्नाळा अभयारण्यात घरटं बांधण्यासाठी घालतोय घिरट्या**
- **मे महिन्यात दाखल झालेल्या खंड्याचा वनविभागाकडून घेतला जातोय वेध**

### विणीचा काळ नाजूक

या पक्ष्याचा विणीचा काळ अत्यंत नाजूक मानला जातो. कारण, याच कालावधीत हे पक्षी प्रजनन करून आपली संख्या वाढविण्याच्या प्रयत्नात असतात. सर्वसाधारणपणे. नदी, ओढे यांच्या वरच्या बाजूस पाणी पातळीचा अंदाज घेऊन मातीमध्ये हे पक्षी बिळ खणून त्यामध्ये आपले घरटे तयार करतात. महत्त्वाचं म्हणजे, आपत्ती काळात पर्याय म्हणून दुसरं घरटंदेखील हे पक्षी जवळच तयार करतात.



### जिल्हा पक्षी

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांनी मागील वर्षी तिबोटी खंड्याला रायगड जिल्हा पक्षी म्हणून घोषित केले आहे.

# पर्यटनबंदी शनिवार, रविवारपुरतीच

## पांडवकडा परिसरात सोमवार ते शुक्रवारी पर्यटकांची गर्दी

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

दरवर्षी प्रमाणे यंदाही खारघर पोलीस ठाणे हद्दीतील पांडवकडा परिसरातील धबधब्याच्या ठिकाणी पावसाळी पर्यटणासाठी जाण्यास पोलिसांनी मनाई केली आहे. तशा प्रकारचे सूचना फलकदेखील पोलिसांनी सर्वत्र लावले आहेत. मात्र, हे करत असताना शनिवार आणि रविवार सोडून इतर दिवशी या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवला जात नसल्याने शनिवार आणि रविवार सोडल्यास बंदी असलेल्या ठिकाणी पर्यटक गर्दी करत असल्याचे पाहायला मिळत असून, यामध्ये •› पान २ वर




तृतीय पुण्यस्मरण



कै. श्री कृष्णा हरी पाटील
मृत्यू दिनांक २८ जून, २०२१

कष्टातून संसार फुलविला, उरली नाही साथ आम्हाला.
तुमचं असणं सर्वकाही होतं. आयुष्यातील एक ते
सुंदर पर्व होत. आज सर्वकाही असल्याची जाणीव आहे
पण तुमचं नसण हीच मोठी उणीव आहे.
"आण्णा" तुमचा सहवास जरी सुटला असला
तरी सुगंध तुमचा, आठवण देत राहील
जीवनाच्या प्रत्येक वळणावर,
आठवण तुमची येत राहील.
"आण्णा" तुमच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण आदरांजली.

श्रीमती राधाबाई कृष्णा पाटील आणि परिवार, माणकुले

# रास्तभाव दुकानदार पुन्हा आक्रमक

## प्रलंबित मागण्यांसाठी तहसीलसमोर धरणे आंदोलन

। माणगाव । प्रतिनिधी ।

राज्यातील सर्व शिधावाटप, रास्त भाव दुकानदारांच्या, प्रलंबित न्याय्य हक्क मागण्यांची पूर्तता करून धान्य वितरणामध्ये येणाऱ्या दैनंदिन अडीअडचणींची सोडवणूक करण्याबाबत अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ पुणे यांच्या मार्गदर्शनानुसार रायगड जिल्हा रास्तभाव धान्य दुकानदार संघटनेने शासनाला वेळोवेळी निवेदने देऊन लक्ष वेधले होते. मात्र, त्या मागण्यांची पूर्तता शासनाकडून झाली नसल्याने तसेच धान्य वितारणामध्ये येणाऱ्या दैनंदिन अडचणींची सोडवणूक करण्याबाबत माणगाव तहसील कार्यालयासमोर रायगड जिल्हा व माणगाव तालुका रास्तभाव धान्य दुकानदार संघटनेच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. त्यावेळी माणगाव तहसीलदार उपस्थित नसल्याने त्यांच्या वतीने नायब तहसीलदार तथा माणगाव तालुका पुरवठा अधिकारी संजय माने यांना निवेदन देण्यात आले. त्यावेळी रायगड जिल्हा अध्यक्ष प्रमोद घोसाळकर, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रशेखर देशमुख, माणगाव तालुकाध्यक्ष अनिल मोरे, वसंत साठे, निलेश कासरेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.



या निवेदनात म्हटले आहे की, गेली अनेक वर्षांपासून स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारकांच्या मागण्या, अडीअडचणी व समस्या यांची सोडवणूक करण्याकरिता महाराष्ट्र राज्यामध्ये शासन स्तरावरून कोणतीही कार्यवाही झालेली नसून, त्या अनुषंगाने कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. दि. १० जानेवारी, २०२४ रोजी अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीवेळी राज्यातील स्वस्त धान्य दुकानदारांच्या मागण्या तसेच मार्जिनमध्ये ५० रुपये इतकी वाढ करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली होती. लवकरच या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल, असे सुतोवच मंत्र्यांकडून त्या बैठकीत करण्यात आले होते. परंतु, आजपर्यंत या विषयाबाबत कोणताही निर्णय झाला नसल्याने गुरुवार, दि. २७ जून रोजी आंदोलन केले.

## मुकबधिर विद्यालयात प्रवेश मोफत

। रायगड । वार्ताहर ।

शासकीय मुकबधिर विद्यालय, विद्यानगर, अलिबाग येथे मोफत प्रवेश देणे सुरु करण्यात आले असून, ०६ ते १६ वयोगटातील मुला-मुलींच्या इच्छुक पालकांनी आपल्या पाल्यांच्या प्रवेशासाठी अधीक्षक, शासकीय मुकबधिर विद्यालय, विद्यानगर-अलिबाग, जि. रायगड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी, रायगड जिल्हा परिषद यांनी केले आहे.

रायगड जिल्हा व कोकण विभागातील कर्णबधिर मुला-मुलींच्या शिक्षणाच्या सोयीसाठी शासनाने विद्यानगर-अलिबाग येथे शासकीय मुकबधिर विद्यालय सुरू केले आहे. या संस्थेत ०६ ते १६ वयोगटातील मुकबधिर मुला-मुलींसाठी इयत्ता १ ली ते ४ थीपर्यंतचे मोफत शिक्षण देण्यात येते.

प्रवेशित मुला-मुलीसाठी स्वतंत्र निवास व्यवस्था आहे. भोजन, वह्या, पुस्तके व शैक्षणिक साधने आदी सुविधा विनामूल्य पुरविण्यात येतात. अधिक माहितीसाठी शिंदे (प्र.अधीक्षक) ९५९४३१३१७९, वेखंडे ७०३०३९००२०, बोरकर ९९७०५२५३४५ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चिवण्यांची प्रतीक्षा संपली

## खवय्यांमध्ये आनंदाचे वातावरण

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।



पावसाळ्यात खाडीकिनारी चिवणी मासे मोठ्या प्रमाणात मिळू लागले आहेत. चिवण्या बाजारात विक्रीसाठी दाखल झाल्याने खवय्ये आनंदी झाले आहेत. मात्र, तरी हंगामाची सुरुवात असल्याने चिवण्या महाग मिळत आहेत. सध्या ४०० रुपये किलो मिळत आहेत. विविध ठिकाणी हे भाव कमी-अधिक आहेत.

खाडीच्या मुखाच्या भागात चिवण्या अधिक प्रमाणात सापडतात. मात्र, खाडीकिनारी प्रदूषित झाल्याने चिवण्यांचे प्रमाण घटले आहे. तरीसुद्धा पावसाळ्यात चिवणी मासे मुबलक मिळतात.

> हंगामातील पहिलेच चिवणी मासे असल्याने मागणी खूप आहे. खवय्ये खरेदीसाठी तुटून पडत आहेत. काही दिवसांनी पाऊस सुरू झाल्यावर आवक वाढल्यानंतर चिवण्या स्वस्त होतील. या माशांच्या अंड्यांना मोठी मागणी असते.
> – गौरी मनोरे, मासळी विक्रेत्या, पेण–पाली

खाडीकिनारी गोड्या पाण्यात हे मासे अंडी घालतात. पावसाच्या सुरुवातीला गाबोळी म्हणजेच पोटात अंडी असलेल्या चिवण्या अधिक सापडतात. अशा वेळी मासेमार व स्थानिक मोठ्या प्रमाणात चिवण्या पकडतात. सध्या या चिवणी माशांची आवक अलिबाग, पेण, उरण, पनवेल, पाली, रोहा आदी मासळी बाजारात काही प्रमाणात सुरू झाली आहे.

> चिवणी मासे खूप चविष्ट असतात. या मोसमात मिळणारे चिवणी मासे आवर्जून खातो. स्वतः जाळे घेऊन मासे पकडायला जातो. वलगणीतदेखील सापडतात. तळून किंवा कालवण करून हे मासे खाल्ले जातात.
> – ॲड. राकेश पाटील, खवय्ये, अलिबाग

### वैशिष्ट्ययपूर्ण शारीरिक रचना

चिवणीची त्वचा अतिशय चिकट व तेलकट असते. त्यामुळे तो हातात धरताना सटकतो. या माशाच्या डोक्याजवळ टणक अणकुचीदार काटा असतो. त्यामुळे मासा सांभाळून पकडावा लागतो. त्याचा काटा टोचल्यास इजा होते.

### साफ करण्याची कला

हा मासा साफ करण्यासाठी चुलीतील राख वापरतात. ती नसेल तर तांदळाचे पीठ वापरतात. डोक्याजवळील काटा हातात राखाडी घेऊन मोडावा लागतो. काहीजण तो सुरी किंवा विळीने कापून टाकतात.

पान १ वरून

## विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ

करणाऱ्या ठेकेदाराने याचाच फायदा घेऊन खूप सारा भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. मधल्या काळात मुलांना धान्य दिले जात होते. परंतु, हे धान्य पूर्णतः निकृष्ट दर्जाचे असल्याचे बोलले जात होते. परंतु, गेली दोन वर्षे जिल्हा परिषदेवर प्रशासक असल्याने ना अधिकारी तोंड उघडत आहेत, ना मुख्याध्यापक. याचा फायदा हा ठेकेदाराला होत आहे. आणि ठेकेदाराने हीच बाब आता कायम ठेवली असून, धान्य देताना वेळेवर न देणे, योग्य प्रमाणात धान्य न देणे, निकृष्ट दर्जाचे धान्य देणे, असा सारा प्रकार सध्या सुरू आहे, अशी चर्चा आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे, जे धान्य पुरविले जाते, त्या धान्याच्या दराचा विचार केला तर सर्वसामान्यांना शॉक लागल्याशिवाय राहणार नाही. मुगडाळ १०३ रुपये किलो, तुरडाळ १०२ रुपये किलो, मसुरडाळ १०२ रूपये किलो, हरभरा ८२ रुपये किलो, चवळी ९५ रुपये किलो, मटकी १०५ रुपये किलो, मूग ८९ रुपये किलो, वटाणा ९५ रुपये किलो, कांदा लसूण मसाला १९७ रुपये किलो, हळद पावडर १९७ रुपये किलो, मीठ १४ रुपये किलो, जिरे २५० रुपये किलो, मोहरी ९४ रुपये किलो, मिरची पावडर १९२ रुपये किलो, गरम मसाला १९२ रुपये किलो अशाप्रकारे दर आहेत. बचत गटाच्या प्रमुखाने मुख्याध्यापकांकडे तक्रार केल्यानंतर मुख्याध्यापकांचे ठरलेले उत्तर ते काय आमच्या घरी पिकते का? जर मुख्याध्यापकांची अशी बोलणी असेल, तर पोषण आहार शिजवणाऱ्या बचत गटांनी काय करायचे? शासनाच्या बेजबाबदारपणाचा फटका पोषण आहार शिजवून देणाऱ्या बचत गटांना बसू शकतो. भविष्यात जर एखादी दुर्दैवी घटना घडली तर मुख्याध्यापक तथा शासनाचे अधिकारी हात वर करुन मोकळे होतील. परंतु, खरी जबाबदारी ही शासनाच्या अधिकाऱ्यांची व मुख्याध्यापकांची आहे. येणारे धान्य हे योग्य प्रकारे येत आहे की नाही, त्याचा दर्जा कोणत्या प्रकारचा आहे. सध्या काही ठिकाणी ग्रामीण भागामध्ये ठेकेदाराने धान्य न पुरविल्याने मुख्याध्यापक स्वतःची आयडीयाची कल्पना लावून जुने निकृष्ट दर्जाचा सामान वापरताना दिसत आहेत. अशा प्रकारच्या निकृष्ट दर्जाचे सामान स्वतःच्या घरी वापरतील का? असा सवाल पालकवर्गातून होत आहे. ग्रामीण भागात बिंधास्तपणे राहिलेले मार्च-एप्रिलचा धान्य वापरत आहेत. या धान्याची व सामानाची अवस्था उकिरड्यावर टाकण्याएवढी वाईट आहे. असे असताना ग्रामीण भागात हेच धान्य शिजवले जात आहे. याकडे ना गटशिक्षण अधिकाऱ्यांचे लक्ष, ना जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांचे. सर्व कसं आलबेल सुरू आहे.

## कांदळवनाची खुलेआम कत्तल

पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरत असताना, मांडवा बंदराच्या विकासानंतर आवास, मांडवा, किहीम या परिसराला अधिकच महत्त्व निर्माण झाले आहे. पर्यटनवाढीलादेखील या परिसरात चालना मिळू लागली आहे. वेगवेगळे सेलिब्रिटी या परिसरात जागा विकत घेऊन बंगले बांधत आहे. परंतु, काही धनदांडग्यांनी विकासाच्या नावाखाली स्थानिकांच्या मदतीने या परिसरातील नैसर्गिक साधन संपत्ती नष्ट करण्याचा घाट घातला असल्याचा प्रकार समोर आला आहे. आवास या ठिकाणी मोठमोठ्या धनदांडग्यांनी जागा घेऊन बंगले, फार्महाऊस बांधले आहेत. त्याच परिसरातील पर्यावरणाचा ऱ्हास करून बंगले उभारण्याचा प्रयत्न धनदांडग्यांनी सुरु केले आहे, असा आरोप मच्छींद्र कवळे यांनी केला आहे. आवास परिसरातील टेकाळी गट नंबर १९१/१ जवळ मोठ्या प्रमाणात कांदळवनांची कत्तल करण्यात आली आहे. या कांदळवनाच्या कत्तलीमुळे भरतीच्या पाण्याचा वेग रोखण्यास अडथळा निर्माण होण्याची भीती आहे. आवाससह परिसरातील अनेक गावांतील मच्छिमार मासेमारी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. परंतु, कांदळवनाच्या तोडीमुळे माशांच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यामुळे मच्छिमारांवर आर्थिक संकट येण्याची चिंता कवळे यांनी व्यक्त केली आहे. काही धनदांडग्यांकडून कांदळवनांची कत्तल होत असताना त्यांच्यावर स्थानिक प्रशासनाकडून कारवाई केली जात नाही. या कांदळवन कत्तलीविरोधात कवळे यांनी आवाज उठविला असून, जिल्हाधिकाऱ्यांसह कांदळवन विभागाकडे तक्रार करणार असल्याचे त्यांनी, सांगितले. यावर ठोस कारवाई झाली नाही, तर आठ दिवसात तीव्र लढा पुकारला जाईल असा इशारा त्यांनी 'कृषीवल'शी बोलताना दिला आहे.

## झुलता पूल निधीअभावी लटकला

नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधीस्थळाचे सुशोभिकरण आदी पर्यटनविकास करण्याची तयारी सुरू झाली. यानंतर ब्रिटिशकालीन हिलस्टेशन कुडपणच्या विकासासाठी तत्कालीन पर्यटन राज्यमंत्री अदिती तटकरे यांनी दौरा केला. मात्र, तत्कालीन खासदार गजानन किर्तीकर यांच्या उपस्थितीतील सभेत पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांना कुडपणला घेऊन जाण्याची घोषणा स्थानिक आमदार भरत गोगावले यांनी करून प्रत्यक्षात ती घोषणा कृतीत आणण्याऐवजी राज्यातील महाविकास आघाडी सरकारला पायउतार व्हावे लागेल, अशी तयारी केली. यानंतर शिवसेना-भाजप युती सरकार अस्तित्वात आले आणि आ. गोगावले यांना मंत्रीपद मिळण्याच्या शक्यतेमुळे पोलादपूरच्या पर्यटन विकासाला चालना मिळण्याच्या आशा पल्लवित झाल्या. मात्र, तत्पूर्वीच माजी राज्यमंत्री अदिती तटकरे यांचादेखील युती सरकारमध्ये समावेश होऊन त्यांना मंत्रीपद मिळाल्याने आ. गोगावले आणि मंत्री अदिती तटकरे हे दोघेही महायुती सरकारमध्ये महत्त्वाच्या स्थानावर असल्याने पोलादपूरकरांना पुन्हा पर्यटन विकासासाठी भरघोस निधी मिळण्याची अपेक्षा आहे.

पोलादपूर तालुक्यातील वाकण गोपाळवाडी येथील घागरकोंडकडे जाणाऱ्या रस्त्यावरील २०१६ मध्ये लोहरज्जू तुटल्याने नादुरूस्त झालेल्या झुलता पुलाची २०१८ मध्ये दुरूस्ती केल्यानंतर २०२१ मध्ये हा झुलता पूल पूर्णपणे वाहून गेला. सद्यःस्थितीत पोलादपूर तालुक्यातील झुलता पुलाच्या ठिकाणी केवळ दोन चौथरे असून, कोणतेही अन्य अवशेष दिसून येत नाहीत. परिणामी, पुलाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून महसुली कर्मचाऱ्यांच्या मेहेरबानीवर चालणाऱ्या वीटभट्ट्यांतील विटांची वाहतूक करणाऱ्या डम्पर्सची ये-जा यंदाच्या मे महिन्याअखेरपर्यंत सातत्याने सुरू होती. यामुळे नजीकच्या काळात याठिकाणी पुन्हा झुलता पूल उभारण्यात न आल्यास अवैध उद्योगांना या परिसरामध्ये चालना मिळण्याची शक्यता दिसून येत आहे.

## विरार-अलिबाग बहुउद्देशीय प्रकल्पाला हुडकोचा 'डोस'

यापूर्वीच विरार ते अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी निधी उभारण्याची मान्यता दिली होती. त्याअनुषंगाने महामंडळाला आरईसी लिमिटेडकडून १७ हजार ५०० कोटी रुपयांचे मुदत कर्ज उभारण्यास मान्यता दिली. या कर्जास व देय व्याजासाठी संपूर्ण शासन हमी आवश्यक असेल. हे कर्ज व त्यावरील व्याजाची परतफेडीचे दायित्व शासनाचे असेल. शासनाकडून या रकमेची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येईल, तसेच वेळोवेळी महामंडळास हा निधी अनुदान म्हणून देण्यात येणार आहे.

१०-१२ वर्षांपासून रखडलेल्या विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला येत्या वर्षभरात सुरुवात करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) घेतला आहे. त्यासाठी येत्या मे महिन्यानंतर टेंडर प्रक्रिया राबविण्याची शक्यता आहे. १२८ कि.मी. लांबीच्या आणि १६ मार्गिका असलेल्या या प्रकल्पासाठी ११३० हेक्टरहून अधिक भूसंपादन करावे लागणार आहे. तर, भूसंपादनासाठी सुमारे २२ हजार कोटींचा खर्च होणार आहे.

मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक व्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. हा प्रकल्प गेल्या १० ते १२ वर्षांपासून रखडला आहे. मुळात, हा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा होता. मात्र, एमएमआरडीएला हा प्रकल्प मार्गी लावण्यात यश येत नसल्याने शेवटी राज्य सरकारने दोन-तीन वर्षांपूर्वी हा प्रकल्प एमएसआरडीसीकडे वर्ग केला होता.

या मार्गिकेचे काम टप्प्या-टप्प्याने करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात मोरबे-करंजाडे या २० कि.मी. लांबीच्या मार्गिकेचे काम करण्यात येणार आहे. त्यानंतर करंजाडे-जेएनपीटी टप्प्यातील काम हाती घेण्यात येणार आहे. ही मार्गिका कार्यान्वित झाल्यास विरार-अलिबाग अंतर कमी होईल, तसेच या मार्गिकेदरम्यानच्या परिसराचा आर्थिक विकासही होण्यास मदत मिळणार आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) विरार ते अलिबागदरम्यान १२८ किलोमीटर लांबीचा मार्ग उभारणार आहे. मुंबई महानगर प्रदेशातील पालघर, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांच्या विकासात हा प्रकल्प अतिशय महत्त्वाचा ठरणार आहे.

एमएमआरडीएकडून एमएसआरडीसीकडे सोपविल्याने महामंडळास तो समृद्धी महामार्गासह प्रस्तावित कोकण एक्स्प्रेस-वेसह जेएनपीटीला जोडता येणे सोपे झाले आहे. सध्या समृद्धी महामार्गाची जेएनपीटीला जोडणी नसल्याने एमएसआरडीसीला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या मुंबई-वडोदरा महामार्गावर अवलंबून राहावे लागत आहे. हा मार्ग समृद्धी आणि कोकण एक्स्प्रेस-वेला जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. याशिवाय मुंबई-अहमदाबाद, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे, जेएनपीटी ते मुंबई-गोवा-पुणे यांना जोडणारा एनएच-४ बी या महामार्गांना जोडण्यात येणार आहे.

## तिबोटी खंड्या जागेच्या शोधात

करण्यासाठी नर आणि मादी एकमेकाला शीळ घालून साद देत असल्याचा आवाजावरून तिबोटी खंड्या अभयारण्यात दाखल झाल्याच्या वृत्तावर वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी शिक्कामोर्तब केले आहे. पक्षी अभयारण्यातील कर्मचारी आवाजाचा वेध घेत तिबोटी खंड्याच्या घरट्याचा शोध घेत आहेत. भूतान, भारतातील ईशान्य आणि अग्नेय भागात आढळतो. तसेच तो श्रीलंकेतही आढळतो. तेथून हा पक्षी मे महिन्याच्या सुमारास प्रजननासाठी रायगडमध्ये येतो. रायगड जिल्ह्यात तो ऑक्टोबर महिन्यापर्यंत राहतो. त्यानंतर तो परत जातो. भारतात खंड्या पक्ष्याच्या १२ प्रजाती आढळतात. त्यांपैकी तिबोटी खंड्या हा पक्षी आकाराने सर्वात लहान आहे. त्यांची लांबी १२ सेमी ते १४ सेमी इतकी असते.

## पर्यटनबंदी शनिवार, रविवारपुरतीच

कॉलेजमधील तरुणाईची संख्या अधिक आहे.

पावसाळी पर्यटन करण्याला अनेकजण पसंती देत असतात. यामुळे पावसाळ्यात धबधब्याची ठिकाणे, तळी, धरणे अशा ठिकाणी मोठी गर्दी होत असते. खारघरमधील पांडवकडा याठिकाणीदेखील पर्यटक मोठी गर्दी करतात. यामुळे पांडवकडा हे ठिकाण पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्याची घोषणा प्रशासनाकडून दरवर्षी करण्यात येते. मात्र, ही घोषणा अद्याप प्रत्यक्षात उतरली नसून, या ठिकाणी येणारे अनेक उत्साही पर्यटक उत्साहाच्या भरात स्टंटबाजी करत असल्याने अनेकदा या ठिकाणी अपघात घडत असतात. घडणारे अपघात रोखण्यासाठी पावसाळ्यात खारघरमधील पांडवकडा, ड्रायव्हिंग रेंज, चाफेवाडी, फणसवाडी, ओवे कॅम्प येथील धरण, तळोजा जेलसमोरील डोंगर तसेच तलाव या ठिकाणी जाण्यास प्रशासनाने १७ जूनपासून ३० सप्टेंबरपर्यंतच्या कालावधीत बंदी घातली आहे. तरीसुद्धा पर्यटक या ठिकाणी गर्दी करत असल्यामुळे भविष्यात या ठिकाणी अपघात घडल्यास याला जबाबदार कोण, असा सवाल उपस्थित होत आहे.

## आठ आमदारांचे राजीनामे मंजूर

यांनी विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. वर्षा गायकवाड या उत्तर मध्य मुंबई लोकसभेतून तर प्रणिती शिंदे सोलापूर, बळवंत वानखडे अमरावती आणि प्रतिभा धानोरकर या चंद्रपूर लोकसभेतून विजयी झाल्या आहेत. त्यामुळे त्यांनी विधानसभेचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेसप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे निलेश लंके, शिवसेना शिंदे गटाचे नेते संदिपान भूमरे रवींद्र वायकर वियजी झालेत. तर राजू पारवे यांनी निवडणुकीच्या आधीच आमदारकीचा राजीनामा दिला होता.

## अजितदादांना धक्का

हे आमदार पक्षबदलाचा निर्णय घेतील, अशी माहिती सूत्रांनी दिली. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकांत अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील आमदारांच्या मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवारांना लक्षणीय मते मिळाली. जनतेमध्ये भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारच्या विरोधात प्रचंड रोष असल्याचे चित्र आहे. तसेच शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून सरकारविरोधात प्रचंड नाराजी आहे. त्याचमुळे लोकसभा निकालांत सत्ताधाऱ्यांना प्रचंड मोठा दणका बसला. पक्षबदल करू इच्छिणाऱ्या आमदारांच्या मतदारसंघातील स्थानिक प्रश्न आणि राजकीय समीकरणेदेखील महाविकास आघाडीच्या बाजूने असल्याचे चित्र आहे. त्यामुळे आपले राजकीय भविष्य धोक्यात येऊ नये, या दृष्टीने आमदारांनी पावले उचलण्यास सुरूवात केली आहे.

## दादांना महायुतीतून बाहेर काढा

केलाय. नाहीतर आता हे दोघेही मंत्री झाले असते. अनेक लोकांना महामंडळ मिळाले असते. आमचे आबासाहेब सोनावणे आणि श्याम गावडे अजित पवार यांच्याकडे निधी मागायला गेले तर तुमचा काय संबंध, १० टक्के निधी देऊ, असे ते म्हणाले. अरे असली सत्ता आपल्याला कशाला हवीये, अशा उद्विग्न भावना त्यांनी व्यक्त केल्या.


### ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड

### जाहीर नोटीस

जा.क्र. /२०२२

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतराणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरेकडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. नं. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ६ | १५२९/२ | श्री समर्थ गृह संस्था पिंपळभाट | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला सदनिका ४०२ चौ.मी. | प्रशांत प्रभाकर पाटील | वसुंधरा मोहन पाटील |
| २ | २ | १००५/१ | कृष्णवाटीका सोसायटी, विद्यानगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला सदनिका चौ.फुट | भालचंद्र रघुनाथ पडते | मनोज भालचंद्र पडते |
| ३ | ४ | १९९३/२ | ॲकॉन्स ट्रन्कुल | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला सदनिका २५२ चौ.फुट | मनाली उपेंद्र कोलाडकर | उमेश विठ्ठल लोहार, दिपाली उमेश लोहार |
| ४ | १ | १०५/२ | सोनल अपार्ट | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला सदनिका ३१३ चौ.फुट | अनिल भास्कर जावकर | महेश शशिकांत चव्हाण |
| ५ | ४ | | वैभव सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ९९६ चौ.फुट | पदमजा डेव्हलपर्स तर्फे उदय पांडुरंग शेठ | नितीन अनंत पाटील |
| ६ | ५ | ६१२ | पिंपळभाट | पक्के सिमेंट बांधकाम घर ५८८ चौ.फुट | प्रमोद मधुकर नांदेकर | रूपाली रूपेश पेढवी |
| ७ | ४ | | सी शेल सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २रा मजला सदनिका ४५५ चौ.फुट | श्रीजी एन्टरप्रायझेस तर्फे विजयकुमार जयंतभाई वसोया | अशोक महेंद्र लोखंडे संगीता अशोक लोखंडे |
| ८ | २ | १०९/३ | शिवकृपा सोसा,जाधवनगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला सदनिका ४७६ चौ.फुट | प्रभा वसंत धांडे | रूही हर्षल कडू |
| ९ | ६ | ८६६/४ | पंचरत्न सोसायटी चेंढरे, | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला सदनिका ७२० चौ.फुट | माला अखिलेश्वर सिंह | श्रीनिवास माणिक चव्हाण |
| १० | ६ | | पिंपळभाट | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ६५०चौ.फुट घर | माधव कमलाकर ठाकूर | मंगला माधव ठाकूर व इतर |
| ११ | ५ | १२१०/ | संकुल गृह,संस्था पिंपळभाट | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला सदनिका ५९५ चौ.फुट | शाईन इम्रान शेख | फिरोज नझीर डालवाले |
| १२ | ५ | १०९७/१८ | संकुल गृह,संस्था पिंपळभाट | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ४०९ चौ.फुट | अनिता राजन पाटील, राजन महादेव पाटील | नवनाथ नाना गायकवाड अश्विनी नवनाथ गायकवाड |
| १३ | ४ | १६८१/१९ | सिगल सोसायटी गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ३३३चौ.फुट | संगिता शैलेंद्र जैन, नितीन शैलेंद्र जैन | सुर्यकांत रघुनाथ नंदे, सुनिता सुर्यकांत नंदे |
| १४ | २ | १००५/१ | कृष्णवाटीका सोसायटी, विद्यानगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळ मजला सदनिका चौ.फुट | भालचंद्र रघुनाथ पडते | मनोज भालचंद्र पडते |
| १५ | ३ | १०२७/१३ | मधुबन सह. गृह.संस्था | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २रा मजला सदनिका ४०० चौ. फुट | प्रमोद धोंडू भगत | गोरेश विलास म्हात्रे |
| १६ | ५ | १७७७/६ | ज्वेल्स ऑफ अलिबाग सोसायटी, | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ला मजला सदनिका ७६० चौ.फुट | मंगेश धर्माजी पाटील, मानसी मंगेश पाटील | शामल विनायक म्हात्रे |
| १७ | ५ | १६१९/९ | ए.एम.अश्विनी सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ४१३ चौ.फुट | गजानन गोविंद घैसास, स्मिता गजानन घैसास | पल्लवी गजानन घैसास |
| १८ | ४ | १५४९/३ | स्वानंद को.ऑफ हौ.सोसा अे.विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ला मजला सदनिका ७३९ चौ.फुट | वैशाली योगेश सज्जनवार योगेश भास्करराव सज्जनवार | रविंद्र साहेबराव चव्हाण, माधुरी रविंद्र चव्हाण |
| १९ | २ | २११/५ | | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ला मजला सदनिका चौ.फुट | प्रमोद नामदेव कांबळी | प्रियेश प्रमोद कांबळी, चेतन प्रमोद कांबळी |
| २० | १ | १०९/१२ | शिवकृपा सोसा, जाधवनगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ला मजला सदनिका चौ.फुट | रोहिणी विजय जाधव | अमोल विजय जाधव, रूपाली प्रशांत अमेरकर, प्रशांत प्रभाकर अमेरकर |
| २१ | ३ | ३३१/१४ | विजया को.ऑप हौ. सोसा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ला मजला सदनिका चौ.फुट | प्रशांत यशवंत शेलार, स्वाती प्रशांत शेलार | प्रशांत यशवंत शेलार |
| २२ | ५ | ६६१/६ | सुजलाम नगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम घर चौ.फुट | प्रदिप जनार्दन कदम | शितल प्रदिप कदम |
| २३ | १ | ८/१ | रूजाता रूपाली सोसा | दुकान गाळा | पांडुरंग तु.दळी | पुजा देवदत्त नेवंगी |

सही/-
**श्री.निलेश लक्ष्मण गावंड**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता.अलिबाग जि.रायगड**

सही/-
**सौ.स्वाती सतिश पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता.अलिबाग जि.रायगड**

**निवडक**

### विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**रसायनी :** पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील तळवली येथील अतुल दत्तात्रेय मालकर हे माझा गाव माझा अभियान या उद्देशाने आपली पत्नी राजिप शाळा व्यवस्थापन समिती सदस्या अश्विनी अतुल मालकर यांच्या वाढदिवसानिमित्त राजिप शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत म्हणून वह्या वाटप करण्यात आले. तसेच, दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक मंगल मुंढे, बोरगे उपस्थित होते.

### इसम गंभीर जखमी

**कोलाड :** मुंबई-गोवा महामार्गावरील खांब गावानजिक पार्थ हॉटेल जवळ एक पादचारी इसम रस्ता ओलांडत असताना मोटारसायकल (एमएच-०६-सीके-९९६४) वरील चालक मोटारसायकल भरदार वेगाने चालवत रस्त्याच्या परिस्थितीकडे दुलक्ष करत रस्ता ओलांडणाऱ्या इसमाला जोरदार धडक दिली. या धडकेत इसमाच्या डाव्या पायाला, हाताला व डोक्याला गंभीर जखमा झाल्या असून, मोटार सायकलचे ही मोठ्या प्रमाणत नुकसान झाले आहे. याबाबत कोलाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### बांधावरील माल चोरीला

**रोहा :** तालुक्यातील तळवली गावानजिक असलेल्या राखीव वनातील एका नाल्याच्या बांधावरील माल चोरीला गेल्याची घटना घडली आहे. एका अज्ञात चोरट्याने हा माल चोरला असून या मालाची एकूण किंमत १ लाख ३३ हजार २९३ रुपये इतकी असल्याचे सांगण्यात येत आहे. याबाबत रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना. नितीन बाबुराव सावरटकर हे करीत आहेत.

### लाखांची फसवणूक

**पेण :** येथील सौभाग्य इन इंटरनॅशनल या रिसॉर्टमध्ये जानेवारी त फेब्रुवारी २०२१ या कालावधीत दोघाजणांनी रूम भाड्याने घेतले होते. या दोघांनी संगनमत करून सौभाग्य इन इंटरनॅशनल या रिसॉर्टमध्ये येऊन राहण्याचे व जेवणाच असे एकूण ३ लाख ६१ हजार ५१७ रूपये बिल न देताच तेथून निघून गेले होते. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### कार चालक फरार

**श्रीवर्धन :** दिघी-म्हसळा रस्त्यावरून पती-पत्नी असे दोघे मोटार सायकल (एमएच-०६-सीके-६३९०) ने जात असताना गोंडघर गावानजिक त्यांच्या पाठीमागुन येणाऱ्या कार चालकाने गाडी अतिवेगाने चालवुन मोटार सायकलला धडक दिली. या धडकेत मोटारसायकलवरील दोघेही खाली पडून त्यांना गंभीर दुखापती झाल्या आहेत. जखमींना कोणतीही वैद्यकिय उपचारासाठी मदत न करताच कारचालकोन तेथुन पळ काढला आहे. याबाबत दिघी (सागरी) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विना परवानगी पुलाचे काम

## जि.प. बांधकाम विभागाचे दुर्लक्ष



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**अलिबाग तालुक्यातील धोकवडे येथील म्हात्रे फाटा ते सासवणे रस्त्यावरील पूल (मोरी) जीर्ण झाली होती. या मोरीचे काम जिल्हा परिषद बांधकाम विभागाची परवानगी न घेता धनदांगड्यांच्या भल्यासाठी काही ठेकेदारांनी केले आहे. मात्र, याकडे जिल्हा परिषद बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्याचा आरोप तेथील स्थानिकांनी केला आहे. त्यात या पुलाचे काम जून्याच पिलरच्या भरवश्यावर करण्यात आल्याने अवजड वाहनांमुळे हा पुल धोकादायक बनण्याची भिती व्यक्त केली जात आहे.**

धोकवडे ग्रामपंचायत हद्दीत काही धनदांडग्यांनी जागा घेतल्या आहेत. त्याठिकाणी लागणारे भराव तसेच खडी, मातीची वाहतूक अवजड वाहनांद्वारे केली जात आहे. म्हात्रे फाटा ते सासवणे रस्त्याला जोडणाऱ्या लहान पुलावरून (मोरी) अवजड वाहनांची ये-जा असते. मात्र, हा पुल जीर्ण झाला असून त्यावर वाहतूक करणे धोकादायक असतानाही अवजड वाहनांची वर्दळ सुरूच ठेवण्यात आली आहे. हा पुल कधीही पडून गावांचा संपर्क तुटण्याचा धोका असल्याची भिती निर्माण झाली असल्यामुळे धनदांडग्यांच्या जागेपर्यंत माती, दगड आदी अवजड वाहनांची वाहतूक बंद होण्याची चिंता ठेकेदारांना निर्माण झाली होती. संबंधित ठेकेदारांनी जिल्हा परिषदेकडून कोणतीही परवानगी न घेता या जीर्ण झालेल्या पुलाची दुरुस्ती केली. दुरुस्ती करताना हा पुल जून्याच पिलरवर उभाण्यात आला आहे. यामुळे हे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

> **संबंधित पुलाच्या कामाबाबत माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल.**
> **- राहूल देवांग, कार्यकारी अभियंता, रायगड जिल्हा परिषद बांधकाम विभाग**

जिल्हा परिषद बांधकाम विभागाची परवानगी न घेता काम केले असताना, जिल्हा परिषद बांधकाम अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले आहे. परंतु, हेच काम सर्वसामान्यांनी केले असते, तर त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारला असता. मात्र, धनदांडग्यांना वेगळा न्याय आणि गोरगरीबांना वेगळा न्याय या जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या दुटप्पी भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे. या विना परवाना बांधकामबाबत जिल्हा परिषद काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# अवैध पार्किंग केल्यास कारवाई

**। पनवेल । वार्ताहर ।**

आशिया खंडातील सर्वात मोठे स्टील मार्केट म्हणून कळंबोली स्टील मार्केटची ओळख आहे. मात्र, याच परिसरात होत असलेल्या अवजड वाहनांच्या अवैध पार्किंगमुळे मोठी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. या अनुषंगाने मंगळवारी (दि.२५) नवी मुंबई वाहतुक पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या आदेशानुसार कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिभाऊ बानकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पांडुरंग साठे यांनी मार्केटमधील अवजड वाहनचालकांची बैठक घेतली. यावेळी स्टील मार्केटमधील पार्किंगच्या गंभीर समस्येबाबत वाहनचालकांना सूचना देण्यात आल्या. या धर्तीवर एकेरी पार्किंग व्यतिरिक्त इतरत्र कुठेही आपली वाहने पार्किंग करणार नाहीत याबाबत कळंबोली वाहतूक पोलिसांनी वाहनचालकांना सक्त ताकीद दिली. तसेच, असे करताना कोणी आढळून आल्यास वाहनांवर गंभीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

# तरुणांनी व्यसनापासून दूर रहाः पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे





**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पालक वर्ग नोकरी व्यवसायात मग्न असल्याने मुलांना एकटेपणा निर्माण होतो. त्याचा फायदा घेत काही मंडळी त्या मुलांना अमिष दाखवून व्यसन करण्यामध्ये गुंतवित असतात. यामुळे तरुणाई व्यसनाच्या आहारी जाण्याची भिती अधिक आहे. व्यसनाच्या आहारी गेल्याने त्याचे दुष्परिणाम त्यांना भोगावे लागतात. त्यामुळे तरुणांनी व्यसनापासून दूर रहा, असा मोलाचा सल्ला पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिला. सीमाशुल्क सागरी तथा निवारण मंडळ कार्यालय अलिबाग यांच्यावतीने अलिबाग येथील पीएनपी एज्युकेशन सेंटरमधील सभागृहात बुधवारी (दि.२६) नशा मुक्त पंधरवडा समारोप आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते.

यावेळी सीमा शुल्क विभागाचे उपआयुक्त पंकज झा, पीएनपी पोर्ट ऑफीसर मनोज ओझा, पीएनपी महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख पल्लवी पाटील, पीएनपी, दिघी पोर्टचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे म्हणाले की, शाळा महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यसनाच्या आहारी गुंतवून त्यांना बिघडविण्याचा काही मंडळी प्रयत्न करतात. समाजासाठी ही मंडळी धोकादायक ठरत आहे. त्यामुळे तरुणांनी नेहमी सतर्क राहणे गरजेचे आहे. आपल्या आजूबाजूला सुरु असलेल्या गैर प्रकारापासून दुर राहण्याबरोबरच पोलीसांना देखील याची माहिति देऊन सहकार्य करावे. युवा पिढी व्यसनापासून दूर राहिली पाहिजे. पोलीस म्हणून आम्ही लक्ष देत आहोत, मात्र पालकांनी देखील मुलांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम करावे, असे सोमनाथ घार्गे यांनी सांगितले.

# वीज चोरीच्या घटनेत वाढ

**। उरण । वार्ताहर ।**

वाढत्या उष्णतेमुळे वीजेची मागणी वाढली आहे. त्यातच उरण शहर तसेच गाव परिसरात रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात वीज चोरीच्या घटनेत वाढ झाली आहे. त्यामुळे वीज चोरीचा भार हा प्रामाणिकपणे वीजेचा वापर व वीज बिल भरणा करणाऱ्या वीज ग्राहकांना सहन करावा लागत आहे.

महावितरणच्या माध्यमातून नगर परिषद, द्रोणागिरी नोड, गोदाम, फार्म हाऊस, ढाबा, हॉटेल तसेच रहिवाशांना विद्युत पुरवठा करण्यात येत आहे. सध्या वाढत्या उष्णतेच्या उकाड्यामुळे वीजेची मागणी ही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याचा फायदा उठवत महावितरण कंपनीमध्ये कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांनी विज मीटरमध्ये हेराफेरी करून व्यवसायिकांना, गावातील श्रीमंत व्यक्ती तसेच गाव पुढाऱ्यांकडून आर्थिक हित जोपासत वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी सहकार्याची भूमिका बजावत आहेत. तसेच, महावितरण कंपनीचे कर्मचारी हे आपआपल्या घरात चोरीची विज वापरत आहेत. एकंदरीत त्यांनी वापरात आणलेल्या विजेचा बोजा हा सर्व सामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे. तरी विज चोरीला लगाम घालण्यासाठी महावितरण कंपनीच्या अभियंत्यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी सर्व सामान्य विज ग्राहक करत आहेत.



● खोल समुद्रातील मासेमारी बंद असल्याने उदरनिर्वाहासाठी काही कोळी बांधव अलिबाग तालुक्यातील नवेदर बेली येथील खाडी पुलावरून जाळी टाकून मासेमारी करत आहेत. (छायाचित्र- समीर मालोदे)




# माजी विद्यार्थ्यांकडून वृक्षारोपण

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील मापगाव येथील राजिप मराठी शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी रविवारी (दि.२३) शाळेच्या आवारात वृक्षारोपण केले. यावेळी शाळेच्या आवारात विविध प्रकारची २० फळझाडे लावण्यात आली. सर्वसामान्य कुटुंबातील असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी त्याकाळी मोठ्या कष्टाने व केलेल्या काटकसरीने मराठी माध्यमातून शिक्षण घेतले होते. आपल्या मुलांना याच शाळेत शिकायला ही पिढी पुढे येत नसल्याची खंत अनेकांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी वृक्षारोपण करताना माजी विद्यार्थ्यांमध्ये मापगाव तंटामुक्त उपाध्यक्ष निसर्ग राऊत तसेच प्रसाद राऊत, रूपेश थळकर, नितेश राऊत, अक्षय राऊत, प्रसन्न खोत, प्रथमेश थळकर, गौतम कोळपे, सागर कोळपे, अक्षय कैलकर, अजित माने, अजिंक्य गोंडाळ, अजय पवार, समीर नाईक, केतन माने आदी माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# आपत्ती व्यवस्थापन सभा संपन्न



**। तळा । वार्ताहर ।**

तळा शहरातील जोगवाडी येथील चंडिका देवी मंदिर व पुसाटी येथे छ. शिवाजी महाराज मंदिर येथे नगराध्यक्षा माधुरी घोलप यांच्या अध्यक्षतेखाली दरडग्रस्त भागात आपत्तीव्यवस्थापनाची सभा घेण्यात आली.

तळगड किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेल्या जोगवाडी व पुसाटी या वाड्यांचे दरडींपासून संरक्षण करणे, त्यांचे सुरक्षित ठिकाणी स्थळांतर करणे. दरडप्रवण क्षेत्रामध्ये तातडीने शासनाची मुदत उपलब्ध करुन देणे, याकरीता या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तळा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांनी दरड भागातील नागरीकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेल्या या दोन्ही वाड्यांमधील नागरीकांनी शक्यतो जास्त पाऊस असल्यास सुरक्षित स्थळी स्थळांतर करावे. त्याकरीता नगरपंचायती मार्फत गो.म. वेदक विद्यामंदिर तळा, राधाकृष्ण मंदिर, चंडिका मंदिर, जी. एम. व्ही इंजिनियरिंग कॉलेज याठिकाणी रहाण्याची व्यवस्था केलेली आहे. त्याकरीता लागणारी संपूर्ण मदत नगरपंचायत स्तरावरुन करण्यात येईल. नागरीकांनी दिवसा व रात्रीच्या वेळेस सतर्क राहून काही आपत्ती निदर्शनास आल्यास नगरपंचायतीमध्ये स्थापन केलेल्या आपत्ती व्यवस्थापन कक्षास कळवावे. याकरीता ०२१४०-२६९०२६, ८४४६४०२१२६ या क्रमांकावर दिवस रात्र सेवा उपलब्ध असल्याची माहिती दिली.

# मुरुडमध्ये वृक्षारोपण



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

सामाजिक बांधिलकीतून विविध प्रकारच्या लोकोपयोगी उपक्रमात पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळ नेहमीच अग्रेसर असते. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी यंदा दरबार रोड मार्गावरील ग्रामीण रुग्णालय, तहसिल कार्यालय, पोलीस ठाणे कार्यालय व सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी अरविंद गायकर, दिव्या सतवीडकर, दामोदर खैरगावकार, दीपक जोशी, देवेंद्र सतवीडकर, उत्तम पाटील, शकील शहाबान, नसीब शहाबान, नायब तहसिलदार शेखर खोत, रमेश गोरे, राधा पाटील, पोलीस निरीक्षक निशा जाधव, पोलीस उप निरीक्षक अविनाश राठोड आदी उपस्थित होते .

# राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी

**। पाली । वार्ताहर ।**

सुधागड एज्युकेशन सोसा. चे शेठ ज.नौ.पालीवाला महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाच्यावतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज याची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी डॉ.एम.ए. बडगुजर यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना तसेच उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले कि, भागवत धर्माच्या झेंड्याखाली निरनिराळ्या जातीजमातींना एकत्र आणण्याचे महान कार्य संत नामदेव, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत चोखामेळा, संत गोरा कुंभार, संत सावतामाळी, संत सेना न्हावी, संत नरहरी सोनार या सर्व जातीतील संतांनी केले. तर, जातिभेद मोडण्याचे, नाहीसे करण्याचे तेच महान कार्य कायदा व कृतीद्वारे राजर्षी शाहू महाराजांनी केले. आजच्या तरुणांनी व विद्यार्थ्यांनी शाहू महाराजाचे कार्य अवगत करून वाटचाल करावी, असे अध्यक्षीय भाषणात डॉ. बडगुजर यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्नेहल बेलवलकर यांनी केले. तसेच, यू. बी. इनामदार, डॉ. एम.ए. सोहनी, विशाखा मानकामे, दीपाली बांगारे, भक्ती साजेकर व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णा जांबेकर व आभार संतोष भोईर यांनी केले.



## जिल्ह्यामध्ये भात लावणीला सुरुवात

# चारसुत्री भात लागवडीवर भर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये पावसाने बुधवारपासून सुरूवात केली असून शेतांमध्ये पाणी साचले आहे. त्यामुळे लावणीच्या कामांनादेखील जिल्ह्यात सुरुवात झाली आहे. मात्र, त्यामध्ये चारसूत्री भात लागवडीवर शेतकऱ्यांनी अधिक भर दिल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये या आधुनिक पध्दतीचा अवलंब केला जात आहे.

पारंपारिक भात लागवडीपासून शेतकऱ्यांना भाताचे उत्पादन मिळत नाही, अशी ओरड कायमच आहे. त्यामुळे कृषी विभागाच्या पुढाकाराने चारसुत्री लागवड पध्दत सुरु करण्यात आली आहे. जिल्ह्यातील कृषी सहाय्यकांनी गावागावात जाऊन चारसुत्री भात लागवड पध्दतीचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

जिल्ह्यात यंदा पावसाने उशीरा एंट्री मारली आहे. त्यामुळे भात लावणीची कामेदेखील लांबणीवर गेली आहेत. आठ ते दहा दिवस लावणीची कामे उशीरा झाल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. परंतु, बुधवारी सकाळपासून पाऊस सुरु असल्याने सखल भागांमध्ये पाणी साचले होते व शेतही पाण्याने भरू लागली आहेत. पावसाने सुरुवात केल्याने शेतकरी सुखावून गेला आहे. नांगरीच्या कामांसह लावणीच्या कामालादेखील सुरुवात करण्यात आली आहे. पारंपारिक भात लावणीपेक्षा शेतकऱ्यांनी चारसुत्री भात लागवड करण्यावर भर दिल्याचे दिसून आले आहे. कमी रोपे, कमी खर्च तसेच कमी मजूरकर आणि उत्पादन अधिक यामुळे या पध्दतीने लागवड करण्यास शेतकरी सरसावले आहे. जिल्ह्यातील प्रत्येक कृषी सहाय्यकांच्या मदतीने या पध्दतीने लागवड केली जात आहे. जिल्ह्यातील सुमारे ८००हून अधिक हेक्टर क्षेत्रामध्ये चारसुत्री पध्दतीने लागवड केली जाणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे.

> **कृषी विभागाच्या सहकार्यातून चार सुत्री भात लागवड पध्दतीचा अवलंब केला आहे. या लागवडीतून मजूरीच्या खर्चाची बचत होण्याबरोबर वेळ ही वाचला जात आहे. त्यामुळे ही पध्दत चांगली आहे, असा विश्वास आहे. चारसुत्री लागवड करताना स्वतः कृषी विभागाचे अधिकारी शेतावर असतात.**
> **- अशोक शिंदे, शेतकरी**



# नवीन कनिष्ठ महाविद्यालय सुरू

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी व मुरुड-जंजिरा हिंदू एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २०२४-२५ या शैक्षणिक वर्षा पासून इयत्ता ११ वी विज्ञान शाखेचे वर्ग सुरु करण्यात आले आहेत.

कोकणातील मुरुड-जंजिरा परिसरातील विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेच्या ज्युनिअर कॉलेजसोबतच व्यक्तिमत्त्व विकास, सैनिकी प्रशिक्षण व साहसी खेळांचे अद्ययावत प्रशिक्षण मिळावे, या उद्देशाने सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी अर्थात भोंसलाने पुढाकार घेतला आहे. मुरुड-जंजिरा हिंदु एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्याने यंदाच्या वर्षापासून ११वी विज्ञान शाखेसाठी सैनिकी प्रशिक्षणसुद्धा सुरु करण्यात येणार आहे. शैक्षणिक क्षेत्रात अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या या दोन नावाजलेल्या संस्थांनी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून त्याचा रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची कौशल्ये, क्षमता, विकसित करण्यासाठी सुद्धा या अभ्यासक्रमाचा निश्चितच फार उपयोग होणार आहे. या अनोख्या उपक्रमांसाठी संस्थेचे अध्यक्ष लेफ्टनंट जनरल डॉ. दत्तात्रय शेकटकर, एअर मार्शल डॉ. अजित भोसले, ॲड. अविनाश भिडे, सीएमए हेमंत देशपांडे व माधव बर्वे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तरी कोकणातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक संधी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे .

# याला म्हणतात थप्पड

लोकसभेला अखेर विरोधी पक्षनेता मिळाला आहे. विरोधी इंडिया आघाडीत काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष आहे. त्यामुळे राहुल गांधींकडे हे पद जाणार हे स्पष्ट होतेच. इतके दिवस मोदी राहुल यांचे नाव घेण्याचेही टाळत होते. आता त्यांना कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा द्यावा लागणार आहे. याला म्हणतात जनतेची थप्पड. राहुल यांनी गेल्या दहा वर्षात मोदी सरकारवर सातत्याने हल्ला चढवून विरोधी नेत्याची भूमिका बजावली होती. पण संख्याबळाचे कारण देत त्यांना किंवा काँग्रेसला अधिकृतरीत्या हे पद देण्याचे मोदी सरकारने नाकारले होते. लोकसभेतील एकूण खासदार आहेत ५४३. विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळण्यासाठी त्याच्या किमान दहा टक्के म्हणजे ५४ वा ५५ सदस्य असायला हवेत अशी अट आहे असे भाजपवाले सांगत असतात. यंदा लोकसभेच्या प्रचारात खुद्द नरेंद्र मोदींनी तसा प्रचार केला. पण हे सर्वस्वी खोटे आहे. अशी कोणतीही अट कोठेही नोंदलेली नाही. विधिमंडळात वा संसदेत अधिकृत गट किंवा पक्ष म्हणून मान्यता मिळण्यासाठीची ती अट आहे. सभापतींनी एखाद्या पक्षाला अशी मान्यता दिली की त्याला विधिमंडळाच्या आवारात कार्यालय व अन्य सुविधा प्राप्त होतात. या तरतुदीचा विरोधी पक्षनेता होण्याशी काहीही संबंध नाही. लोकसभेचे माजी सचिव पीडीटी आचार्य यांनी हे अनेकदा स्पष्ट केलेले आहे. संसद वा विधिमंडळातील सर्वात मोठ्या गटाच्या नेत्याला (मग त्या गटाची संख्या कितीही कमी वा जास्त असो) विरोधी पक्षनेता म्हणून मान्यता दिलीच पाहिजे असे आचार्य यांचे म्हणणे आहे. तरीही मोदी यांनी दहा वर्षे हे पद विरोधकांना देण्याचे नाकारले. अर्थात, ज्या मोदींनी लोकशाहीच्या हरेक तत्वांवर येता-जाता बुलडोझर चालवला त्यांच्याकडून वेगळी अपेक्षा करणे कठीण आहे. याच मोदींनी २०१९ पासून पाच वर्षे लोकसभेचे उपाध्यक्षपदही रिकामे ठेवले होते. कारण, संकेतांनुसार, ते विरोधकांना द्यावे लागेल अशी भीती त्यांना वाटत होती.

### जनतेचा मोदींना आदेश

अखेर लोकसभेच्या निकालांमधून जनतेनेच याचा फैसला केला व मोदींना हे फालतू अडवणुकीचे धंदे बंद करण्याचा आदेश दिला. राहुल यांना भाजपवाल्यांनी आजवर पप्पू म्हणून हिणवले. स्वतंत्र भारतात कोणत्याही विरोधी नेत्याला इतक्या खालच्या पातळीवर जाऊन कोणीही हिणवले नव्हते. तरीही राहुल यांनी आपला मार्ग सोडला नाही. गेल्या चार वर्षात त्यांनी काढलेल्या भारत जोडो पदयात्रांमुळे तर त्यांच्या विरोधकांची बोलती पुरती बंद झाली. तरुण तसेच महिलांमध्ये राहुल अतिशय लोकप्रिय झाले. त्यांनी रोजगार, महागाई असे विषय उचलून धरले. मोदी सरकारच्या भ्रष्टाचाराबाबत सातत्याने आवाज उठवला. राफेल घोटाळ्याचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाने थांबवले असले तरी अनेक प्रश्न अनुत्तरीत राहिले. लढाऊ विमानांच्या दुरुस्तीबाबतचा कोणताही अनुभव नसतानाही अनिल अंबानींच्या कंपनीला त्या कंत्राटात का सामील करून घेतले होते याचे उत्तर आजही मिळालेले नाही. दुसऱ्या कार्यकाळात मात्र निवडणूक रोख्यांच्या योजनेला खुद्द सर्वोच्च न्यायालयाने भ्रष्टाचारी ठरवून बंद केले. अर्थात, मोदी व भाजप इतके निगरगट्ट आहेत की त्यांनी याचा कोणताही दोष आपल्या अंगाला लावून घेतला नाही. अदानी प्रकरणातही हेच घडले. मोदी सरकारने अदानीवर उधळलेल्या सवलती वा त्याला केलेली मदत ही जगजाहीर आहे. राहुल गांधी यांनी अत्यंत निर्भयपणे मोदी-अदानी भानगड संबंधांवर हल्ला केला. यामुळे उद्योगपतींची लॉबी काँग्रेसच्या विरोधात जाण्याचा धोका होता. जनतेत या विषयाला किती पाठिंबा मिळेल याचा भरवसा नव्हता. तरीही त्यांनी देशहितासाठी हा मुद्दा लावून धरला. आता ते लोकसभेत नरेंद्र मोदींच्या समोरच्या खुर्चीवर बसून थेट अनेक बोचरे सवाल करू शकतील. विरोधी पक्षनेता म्हणून लोकसभेत बोलण्याबाबत व भाषण करण्याबाबत त्यांना काही विशेष अधिकार असतील. सभापती ओम बिर्ला ते नाकारू शकणार नाहीत. या बिर्ला यांनी गेल्या लोकसभेमध्ये राहुल किंवा अन्य विरोधी सदस्य बोलत असताना त्यांचे उद्गार कामकाजातून परस्पर उडवणे, त्यांच्यावर कॅमेरा राहणार नाही याची काळजी घेणे असल्या उचापती केल्या होत्या. आता त्यांच्यावरही वचक राहील.

### सर्वांना बरोबर घ्या

राहुल यांच्याकडे आता देशाचे लक्ष असेल. नरेंद्र मोदी आणि सरकारला त्यांनी खिंडित पकडावे अशी अपेक्षा आहे. मोदी आपल्या प्रत्येक भाषणात नेहरू, गांधी व काँग्रेस यांच्याविरुध्द प्रचंड खोटा प्रचार करीत असतात. त्याला जबाब देण्यासाठी राहुल यांना इतिहासाची चांगली माहिती ठेवावी लागेल. भूतकाळातील निर्णयांचे पक्के ज्ञान असावे लागेल. राहुल यांना सरकारमध्ये काम करण्याचा कोणताही अनुभव नाही. नोकरशाही कशी चालते, कायदे कसे बनतात, योजनांची अंमलबजावणी नेमकी कशी होते, एखाद्या कार्यक्रमासाठी आर्थिक तरतूद कशी केली जाते याबाबत त्यांना प्रत्यक्ष माहिती नाही. ती त्यांना करून घ्यावी लागेल. त्यासाठी चांगले सल्लागार नेमावे लागतील. तरच ते सरकारचे वाभाडे काढू शकतील. आता राहुल यांना घेरण्यासाठी भाजपवाले अनेक खासदार व मंत्री यांना पुढे करतील. राहुल यांचे हल्ले मोदींपर्यंत पोचू नयेत असेही प्रयत्न केले जातील. त्याला प्रत्युत्तर द्यायचे असल्यास राहुल यांना काँग्रेसखेरीज सर्व विरोधकांना बरोबर घेऊन चालावे लागेल. विरोधी पक्षनेते ही त्यांची भूमिका सभागृहाबाहेर व चोवीस तास दिसावी लागेल. काल सभापतीपदाच्या निवडीच्या वेळी काँग्रेसने आपल्याला न विचारताच सुरेश यांची उमेदवारी जाहीर केली अशी तक्रार तृणमूल काँग्रेसने केली. असे पुन्हा घडू नये याची काळजी राहुल यांना घ्यावी लागेल. आज मोदींचे सरकार नीतीश व चंद्राबाबूंच्या पाठिंब्यावर उभे आहे. मोदींची हुकुमशाही प्रवृत्ती पाहता थोड्याच दिवसात त्यांच्यात कुरबुरी सुरू होऊ शकतात. यांचा फायदा उठवण्यासाठीही राहुल यांना सतर्क राहावे लागेल. या अपेक्षा ते कितपत पूर्ण करू शकतात हे लवकरच दिसेल. पण आज तरी मोदींच्या मस्तवालपणाला अटकाव करण्याची एक व्यवस्था राहुल यांच्या रुपाने उभी राहणार आहे हे नक्की.

विचार

# तलाव वाचवा, शहरे वाचवा

*भारतासारख्या देशात तलावाच्या काठावर अनेक सण, श्रद्धा आणि धार्मिक उपक्रम आवश्यक मानले जातात. त्यांचे अस्तित्व तलावाच्या आरोग्यावर अवलंबून आहे. तलाव प्रदूषित झाल्यास किंवा त्यातले पाणी आटल्यास त्या भागातील कार्बन आणि उष्णता शोषणावर परिणाम होतो. त्यामुळे जैवविविधतेचे नुकसान होते आणि पूर येऊन दुष्काळ पडतो. तलाव वाचले तरच गाव आणि शहरे वाचू शकतील.*

मिलिंद बेंडाळे

'अर्थ फ्युचर' या आंतरराष्ट्रीय नियतकालिकाच्या ताज्या अंकात प्रकाशित 'ग्लोबल लेक हेल्थ इन द एन्थ्रोपोसीन: सोशल इम्प्लिकेशन्स अँड ट्रीटमेंट स्ट्रॅटेजी' या संशोधनात मानवी आरोग्यासाठी रणनीती बनवल्या जातात, त्याचप्रमाणे तलाव वाचवण्यासाठीही सर्वसमावेशक उपाययोजनांची गरज आहे, असे म्हटले आहे. जागतिक पातळीवर झालेल्या या संशोधनात जगातील दहा हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या १४ लाख २७ हजार ६८८ तलावांच्या आरोग्याचे मूल्यांकन करण्यात आले आहे. त्यात भारतातील ३०४३ जलसाठ्यांचा समावेश होता. सरोवरे ही जिवंत प्रणाली आहे. श्वास घेण्यासाठी ऑक्सिजन, आनंदी राहण्यासाठी स्वच्छ पाणी आणि त्यांच्यातील प्राणी जिवंत ठेवण्यासाठी ऊर्जा आणि पोषक तत्वांचा संतुलित पुरवठा आवश्यक आहे. मानवाप्रमाणेच सरोवरांना ताप, अतिउष्णता, रक्ताभिसरण, श्वसन, पौष्टिक आणि चयापचय समस्यांपासून संक्रमण आणि विषबाधेपर्यंत विविध आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागते. आणखी एक महत्वाची बाब म्हणजे सरोवरांमध्ये पावसाच्या पाण्यापेक्षा दुप्पट पाण्याचे बाष्पीभवन होते. सरोवरांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केल्यास संपूर्ण पर्यावरण व्यवस्थेवर त्याचा परिणाम होईल. त्यामुळे तलावांवर अवलंबून असलेल्या मोठ्या लोकसंख्येच्या सामाजिक-आर्थिक जीवनात व्यत्यय येईल. भारतातील प्रत्येक तलावाभोवती भूवैज्ञानिक इतिहासाची आणि पर्यावरणीय महत्त्वाची अनोखी कहाणी आहे. स्थानिक समुदायाचे जलस्रोत निरोगी नसल्यास जलजन्य आजार वाढतात. तलाव आणि तलावांमध्ये कमी ऑक्सिजन पातळीदेखील धोकादायक आहे. ते इतर जलचर प्राणी आणि वनस्पतींसाठी घातक आहे.

पाण्यात मोठ्या प्रमाणात दूषित कचरा पसरल्यामुळे ऑक्सिजनची पातळी कमी होते. त्यामुळे तलावातील पाण्यातील क्षारता वाढते. हे तलावाचे आरोग्य बिघडल्याचे लक्षण आहे. निरोगी मानवी शरीराप्रमाणे सरोवरांनाही पुरेसा ऑक्सिजन आणि जास्त क्षारांपासून मुक्ती हवी असते. नदीचे पाणी आरोग्यदायी नसल्यास त्यातून तयार होणाऱ्या उत्पादनातही पोषणाचा अभाव असतो. वातावरणातील बदल आणि 'ग्लोबल वार्मिंग'चा तलावांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. पाण्याच्या तीव्र शोषणामुळे आणि पावसाच्या अनियमिततेमुळे अनेक तलावांमधील पाण्याची पातळी झपाट्याने खाली गेली आहे तर दुसरीकडे पिण्याचे पाणी, सिंचन आणि मत्स्यशेती इत्यादींसाठी पाण्याचा वापर वाढला आहे. तलावांचे पोषण संतुलन बिघडते, तेव्हा पोषक घटकांचे प्रमाण खूप जास्त किंवा खूप कमी होते. अशा प्रकारे सरोवराची परिसंस्था असंतुलित होते. जलस्रोतांच्या वरच्या पृष्ठभागावर हिरवा थर तयार होतो. त्याला वैज्ञानिक भाषेत 'युट्रोफिकेशन' म्हणतात. हिरवळ हे सूक्ष्म किंवा फिलामेंटस शैवाल नावाच्या जीवाणूंच्या प्रकारामुळे होते. गटाराचे घाणेरडे पाणी, कारखान्यांचे सांडपाणी आणि शेतातून वाहून जाणारे शेणखत व खत यामुळे हे प्रमाण झपाट्याने वाढते. त्यामुळे पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाणही कमी होते. अशा शैवालांचे दुष्परिणाम केवळ पाण्याच्या स्त्रोतांपुरते मर्यादित रहात नाहीत तर मानवी आरोग्यासाठीही धोकादायक असू शकतात. कारण काही सायनोबॅक्टेरिया विषारी पदार्थ तयार करतात. त्यामुळे श्वसन, जठरांत्र आणि त्वचेशी संबंधित समस्या उद्‌भवतात.

या आंतरराष्ट्रीय संशोधनात असे दिसून आले आहे की रोगग्रस्त तलावामध्ये न्यूरोटॉक्सिसिटीचा प्रभाव आहे. त्यामुळे सेल्युलर आणि जीनोमिक नुकसान होते. प्रथिने संश्लेषण प्रतिबंध आणि मानव आणि वन्यजीवांमध्ये संभाव्य कार्सिनोजेनेसिस होतो. अलिकडे नैनिताल जिल्ह्यातील भीमताल तलाव धोक्यात आला आहे. तलावाची खोली आणि क्षेत्रफळ सातत्याने कमी होत आहे. त्याला तलावातील कचरा आणि घाण कारणीभूत असल्याचे सांगितले जाते. अशा स्थितीत भीमतालचे अस्तित्व वाचवण्याची मागणी होत आहे. नैनिताल जिल्ह्यात अनेक लहान-मोठे तलाव आहेत. नैनितालची ओळख तलावांनी केली जाते; परंतु येथील ऐतिहासिक तलाव, मग ते नैनी तलाव असो किंवा भीमताल; कोरडे पडण्याच्या मार्गावर आहेत. भीमतालचे अस्तित्व वाचवण्यासाठी स्थानिक लोक अनेक दशकांपासून धडपडत आहेत, तरीही शासन याकडे लक्ष देत नाही. अशा परिस्थितीत परिस्थिती हळूहळू बिघडत आहे. भीमताल हे एक सुंदर ठिकाण आहे. ते सुंदर दऱ्या आणि तलावांसाठी ओळखले जाते; परंतु आता दुरवस्थेमुळे पर्यटकांनी त्याकडे पाठ फिरवली आहे. १९०४ मध्ये भीमताल तलावाचे क्षेत्रफळ ६० हेक्टर होते. ते १९८४ मध्ये ४६.२६ हेक्टर इतके कमी झाले. 'इंडिया वॉटर रिसोर्सेस'नुसार, भीमताल सरोवराची खोली १८७१ मध्ये ३९ मीटर होती. १९७५ मध्ये घटून ती २७ मीटर झाली. त्यानंतर १९८५ मध्ये ती २२ मीटर झाली तर सद्यस्थितीत केवळ १७ मीटर आहे. ढिगाऱ्यांमुळे तलावाचा आकारही सातत्याने कमी होत आहे. सरोवरात अनेक ठिकाणी कचरा दिसतो. अशा स्थितीत या तलावाचे अस्तित्व वाचवण्यासाठी शासन आणि प्रशासनाने स्वच्छता करायला हवी. डोंगराच्या चारही बाजुंनी हिरवाईने नटलेला नैसर्गिक भीमताल तलाव एके काळी पर्यटकांची पहिली पसंती होता; मात्र आता हळूहळू मागे पडत आहे. आताच प्रयत्न न झाल्यास भविष्यात या तलावाला आणखी धोका निर्माण होऊ शकतो. पांडवांमधील भीमाच्या नावावरून भीमताल तलावाचे नाव पडले असे मानले जाते. पांडवांच्या वनवासात भीम येथे आला, तेव्हा जुने भीमेश्वर महादेव मंदिर बांधले गेले, असे मानले जाते. इतिहास आणि पौराणिक कथेनुसार वनवासात असताना पांडवांनी या तलावाला भेट दिली होती, असे मानले जाते. पांडवांची पत्नी द्रौपदीला तहान लागली म्हणून भीमाने गदा जमिनीवर एवढ्या जोराने मारली की एक खड्डा तयार झाला. नंतर चमत्कारिकरित्या तो पाण्याने भरला. या घटनेमुळे तलावाचे नाव भीमताल पडले. १८४१ पर्यंत फक्त डोंगरावरील स्थानिक लोकांना या तलावाची माहिती होती. नंतर ब्रिटिशांनी याचा शोध लावला. पावसाळ्यात डोंगर आणि आजूबाजूच्या परिसरातून मोठ्या प्रमाणात कचरा आणि घाण तलावात जाते. त्यामुळे तलावात मोठ्या प्रमाणात कचरा आणि घाण साचली आहे. 'सीवर ट्रीटमेंट पंपिंग'द्वारे भीमताल तलावातील डेब्रिस आणि गाळ काढण्याची योजना तयार करण्यात येत आहे. त्यासाठी डीपीआर तयार करण्यात येत आहे. डीपीआर तयार करून सरकारकडून बजेट आल्यानंतर तलावांची स्वच्छता केली जाईल, असे सांगितले जाते.

बंगळुरूलाही तलावाचे शहर म्हटले जाते. बंगळुरूमध्ये १६७ तलाव आहेत. त्यांचे व्यवस्थापन बृहतबंगळुरु महानगरपालिका करतात. बंगलोर विकास प्राधिकरण, कर्नाटक वन विभाग, तलाव विकास प्राधिकरण आणि बंगलोर मेट्रो यांसारखी इतर प्राधिकरणे मिळून बंगळुरूच्या तलावांचे व्यवस्थापन करतात. बंगळुरूमधील १६७ पैकी ४१ तलावांचे पाणी नमुने गोळा केले तेव्हा सुमारे ३९ तलाव 'श्रेणी ई' (मासेपालनासाठी योग्य नाहीत) म्हणून वर्गीकृत करण्यात आले. सरोवराची स्वतःची परिसंस्था असते. त्यात पक्षी, कीटक, सरपटणारे प्राणी आणि जलचर वाढतात, जे पावसाच्या पाण्याने भरलेले असते. त्याला चांगला तलाव म्हटले जाते; परंतु पृथ्वीवरील एकमेव प्रबळ प्रजाती बनायचे असल्यामुळे मनुष्य इतरांसाठी कोणताही पर्याय सोडत नाही. लोकांनी सार्वजनिक मालमत्तेशी संबंध तोडले आहेत. ते जतन करण्याशी त्यांचा काहीही संबंध नाही, असे त्यांना वाटते. मोकळ्या जागांवर काँक्रीटची जंगले उभी रहात आहेत. तलाव, जलस्रोतांची देखभाल हे आपल्या देशासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. खासगी कंपन्यांनी त्यांच्या सामजिक दायित्व निधीचा वापर तलावांच्या देखभालीसाठी, ते दत्तक घेण्यासाठी करावा अशी सरकारची अपेक्षा आहे. पाणी हा राज्याचा विषय आहे. त्यामुळे बहुतांश तरतुदी आणि नियम स्थानिक सरकारांद्वारे केले जातात. तलावांचा वापर व्यावसायिक कारणांसाठी केला जात आहे. तलाव हळूहळू उद्यान आणि क्रीडांगणांमध्ये रूपांतरित केले जातात. अनावश्यक संरचना बांधल्या जातात. अशा संरचना तलावांच्या संवर्धनास हातभार लावत नाहीत. उत्तर बंगळुरूमधील डोड्डाबोम्मासांद्र केरे येथून निर्जंतुकीकरणाच्या नावाखाली तलाव आणि जंगलाच्या जमिनीचा वापर करून पार्किंग लॉट, मोठी उद्याने, खुली व्यायामशाळा बांधली जात आहे. तलावाच्या क्षेत्रामध्ये बॅडमिंटन, थ्रोबॉल, शॉपिंग कॉम्प्लेक्स, शासकीय कार्यालये, थीमवर आधारित वॉटर पार्क, रेस्टॉरंटस, क्रीडा संकुल आदी अतिक्रमणे झाली आहेत. नाले स्वच्छ होत नाहीत, कचरा आणि बांधकामे साफ केली जात नाहीत, तोपर्यंत तलाव चांगल्या पावसाच्या पाण्याने भरणार नाहीत. त्यामुळे यापुढे शहरे कशी वाचतील, हा प्रश्नच आहे.

आजकाल

# देवेंद्रजी विरोधक नव्हे आपण खोटं बोलत आहात

तुषार गायकवाड



महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन २०२४ च्या पूर्वसंध्येला गृहमंत्री व अर्धे उपमुख्यमंत्री तसेच महाराष्ट्र भाजपाची खासदार संख्या २३ वरुन ९ पर्यंत नेणारे चाणक्य देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत बोलताना नेहमीच्या शैलीत विरोधकांवर तोंडसुख घेतले. अर्थातच या राज्य सरकारचे हे शेवटचे अधिवेशन असल्याने अधिवेशनातून मराठवाड्यातील जनतेच्या हाती काही पडावे अशी अपेक्षा आहे.

पण फडणवीसांनी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येलाच स्वतः आखणी करुन जाहीर केलेल्या तथाकथित पंचामृत अर्थसंकल्पातील मराठवाडा वॉटर ग्रिड प्रकल्पाची जबाबदारी झटकत केंद्राकडे बोट दाखवून स्वतःची कातडी तर वाचवलीच पण त्याचबरोबर मराठवाडा वॉटर ग्रिड प्रकल्प महाविकास आघाडी सरकारने बंद केला होता, असे म्हणत १० वर्षे केंद्रातील एकहाती सत्ता व साडेसात वर्षे राज्यातील सत्तेच्या माध्यमातून मराठवाडा वॉटर ग्रिड बाबत काहीच न केल्याच्या अपयशाचे खापर महाविकास आघाडीवर फोडले.

मुळात आपण मुख्यमंत्री असताना ४ ऑक्टोबर २०१६ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अंदाजित ३४,००० कोटी रुपयांच्या मराठवाडा वॉटर ग्रिड योजनेला मंजुरी देण्यात आली. मराठवाड्यातील एकूण ११ जलाशय तसेच उजनी जलाशयातून जलवाहिनी टाकल्यानंतर त्यातून पिण्याचे पाणी तसेच उद्योग व कृषी क्षेत्रासाठी पाणी देता येणार असल्याचे सांगितले गेले. मात्र केंद्रातील ''मोदी सरकारच्या'' जलशक्ती मंत्रालयाकडे हा प्रस्ताव पाठविल्यानंतर केंद्रानेच पिण्याच्या पाण्याशिवाय इतर पाण्यासाठी ग्रिड प्रकल्प करण्यास निधी देता येणार नाही! असे सांगत तुमच्या तथाकथित अव्यहार्य भगीरथ प्रकल्पाचा बोऱ्या वाजवला.

पण पूर्ण बहुमताच्या सत्तेपुढे तुम्हाला आकाशही ठेंगणे वाटत असल्याने आपण इस्रायलच्या मेकारोटा डेव्हलपमेंट ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनी सोबत राज्य सरकारचा करार केंद्र सरकारच्या सल्लामसलतीच्या आधीच केला होता. अर्धवट माहितीच्या आधारे केलेला करार तुमच्याच अंगलट आल्यावर मेराकोटा कंपनीकडून विविध ६ प्रकारचे प्रकल्प अहवाल घेतले गेले. त्यानुसार सदरील प्रकल्पात अभियांत्रिकीसह तांत्रिकतेमध्ये १० टक्के बदल करुन या योजनेला परवानगी देण्यात आली. बदललेल्या प्रकल्पाच्या निविदा २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी निघाल्या. निवडणूकीनंतर महाविकास आघाडी सरकारचे सत्तेवर आले. महाविकास आघाडीचे तत्कालीन अर्थमंत्री अजित पवार यांनी सदर प्रकल्प अव्यवहार्य ठरवून निधीस नकार दिला. सुमारे २६ महिन्यांपूर्वी आपण परत राज्याच्या सत्तेवर विराजमान झाल्यानंतर सदर प्रकल्पातून उद्योग आणि कृषी पाणीपुरवठा काढून टाकत केवळ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यापर्यंतच ही प्रकल्पाची मर्यादा आखत प्रकल्पातील अव्यवहार्यता रद्द केली.

त्यानंतर हा प्रकल्प केंद्राकडे पाठवला तेव्हा केंद्राने या प्रकल्पासाठी निधी नाही सांगत हात वर केले. केंद्रीय अर्थसंकल्पातून इतका निधी देता येत नाही. केंद्राच्या जलजीवन मिशन मध्येही इतक्या मोठ्या रक्कमेची तरतूद नाही. त्यामुळे जागतिक बँकेचे कर्ज घेऊन राज्यानेच हा प्रकल्प अंमलात आणावा असा सल्ला केंद्र सरकारने म्हणजे मोदींनी दिलाय.

पण तुम्ही महाराष्ट्रातील जनतेला खोटं सांगून जनतेची दिशाभूल करत स्वतःचे नॅरेटिव्ह सेट करताय. वॉटर ग्रिड प्रकल्पास अव्यवहार्य ठरवणारे अजितदादा पवार तुमच्या मांडीला मांडी लावून बसलेत. तेव्हाही अजितदादा योग्यच बोलत होते. हे केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाने अधोरेखित केले म्हणूनच या प्रकल्पातील उद्योग व कृषी पाणीपुरवठ्याची अव्यवहार्यता रद्द करावी लागली. मग महाविकास आघाडी प्रकल्प रखडण्यास जबाबदार कशी?

देवेंद्रभाऊ... महाराष्ट्रातील, मराठवाड्यातील जनतेला मूर्ख समजायचे बंद करा. नॅरेटीव्हचे तोरसेकरी तुणंतुणं वाजवण्यापेक्षा तुमच्या वॉर रुमचे परप्रांतीय अमराठी वॉररुमकरी बदलून महाराष्ट्र भाजपाला उपकृत करा.

लोकसंसद

## उच्च न्यायालयाचा योग्य निर्णय

मुंबईतील चेंबूर येथील आचार्य-मराठे महाविद्यालयाने विद्यार्थिनींना हिजाब आणि बुरखा परिधान करण्यास घातलेल्या बंदी विरोधात मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतलेल्या महाविद्यालयातील नऊ विद्यार्थिनींची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली ते योग्यच झाले. महाविद्यालयाने केलेल्या बंदीमुळे आमच्या धार्मिक स्वातंत्र्यावर गदा येत असल्याचा तसेच हिजाब घालणे ही धार्मिक अत्यावश्यक बाब असल्याचा दावा या विद्यार्थिनींनी केला होता. मात्र महाविद्यालयाने बंदीचे समर्थन करताना ही बंदी केवळ एकसमान ड्रेस कोड लागू करण्यासाठी आहे असा युक्तिवाद केला. तो ऐकून घेतल्यानंतर उच्च न्यायालयाने त्या विद्यार्थिनींची याचिका फेटाळून लावली. दोन वर्षांपूर्वी फेब्रुवारी २०२२ मध्ये कर्नाटक राज्यात असाच हिजाब वाद उफाळून आला होता. त्यावेळीही कर्नाटक उच्च न्यायालयाने हिजाब परिधान करण्यावरची बंदी कायम केली होती. वास्तविक विद्यार्थी महाविद्यालयात शिक्षण घ्यायला येतात. शिक्षणाच्या या पवित्र ठिकाणी सर्व विद्यार्थ्यांचा दर्जा एकसमान असतो. अशा ठिकाणी धर्म कोणताही असो, धर्म आचरणाच्या गोष्टी हव्यातच कशाला? या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने संबंधितांचे कान टोचले हे योग्यच झाले.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२८ जून**

**१९३७ :** लेखक, संपादक, विचारवंत गंगाधर विठोबाजी पानतावणे यांचा जन्म २८ जून १९३७ रोजी नागपूर येथे झाला. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण नागपुरातून झाले. नागपूर महाविद्यालयातून बी.ए. आणि एम.ए. ची पदवी संपादन केल्यावर पीएच.डी.ची पदवी संपादन केली. मराठीचे कार्यरत होते. प्राध्यापक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात ते अखेरपर्यंत प्रतिष्ठानमधून त्यांनी लेखनाला सुरुवात केली. त्यानंतर धम्मचर्चा, किल्ले पन्हाळा ते किल्ले विशालगड, हे प्रवासवर्णन मूल्यवेध, मूकनायक, विद्रोहाचे पाणी पेटते आहे. वादळाचे वंशज, दलित वैचारिक वाङ्मय साहित्य प्रकृती आणि प्रवृत्ती, साहित्य शोध आणि संवाद आदी वैचारिक आणि समीक्षात्मक अशी १५ पुस्तके त्यांच्या नावावर आहे. याशिवाय दलित आत्मकथन, दलित साहित्य: चर्चा आणि चिंतन, लोकरंग, स्त्री आत्मकथन, सांस्कृतिक इतिहास महारांचा ही महत्त्वपूर्ण संपादने पानतावणे यांच्या नावावर आहेत. याशिवाय पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या ग्रंथातून आंबेडकरांच्या मराठी वृत्तपत्रीय लेखनाचा अभ्यास, वादळाचे वंशज'मधून दलित लेखकांच्या साहित्यिक व जीवनकार्याचा अभ्यास, विद्रोहाचे पाणी पेटते आहे.' विचार युगाचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'प्रबोधनाच्या दिशा' मधून दलितांचे समाज व संस्कृती दिवस संशोधन ही त्यांची अन्य ग्रंथसंपदा १९६८ च्या सुमारास पदरमोड करून त्यांनी 'अस्मितादर्श' या नियतकालिकाच्या संपादनाची जबाबदारी स्विकारली. याद्वारे दलित साहित्याच्या चळवळीला वैचारिक अधिष्ठान देणारे गंभीर व्यासपीठ म्हणून या नितयकालिकाला आकार देण्याचे ऐतिहासिक महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. स्वतः दलित असल्याने जातीव्यवस्थेचे चटके त्यांना बसले असताना त्याचा बाऊ करून मानसन्माचाची पदे त्यांना प्राप्त झाली. सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न त्यांनी कधीच केला नाही. **१९२२:-** लोकप्रिय गीतकार प्रा. भालचंद्र गजानन खांडेकर यांचा जन्म. 'चंद्रप्रकाश', 'गंधसमीर' हे त्यांचे कवितासंग्रह. प्रेमातील विविध भावछटांचे उत्कट प्रकटीकरण त्यांच्या कवितांतून दिसतेच, परंतु दांभिकता, अन्याया विरुध्द बंड पुकारण्याची प्रवृत्तीही दिसते. 'श्लोक केकावली', 'संजीवनी' या काव्याची तसेच 'सं. एकच प्याला', 'सं. शारदा' या नाटकांची संहिता-संपादने त्यांनी केली. जन्मदिनाच्याच तारखेस, २८ जून १९९० रोजी त्यांचे निधन झाले. भा. ग. खांडेकरांनी प्रचंड लिखाण केले. त्यामध्ये 'संत चोखामेळा-अभंगवाणी', 'ज्ञानेश्वर अध्याय १, ३, ६, ९, ११, १२, १५, १६, १७, १८ इ. सहकार्याने संपादन केले. याशिवाय 'एकच प्याला' हे रा.ग.गडकरी,'विराटपर्व' हे मुक्तेश्वरांच्या काव्याचे, 'शारदा' हे देवलांच्या नाटका चे श्लोक 'केकावली' हे मोरोपंताच्या काव्यांचे, 'सौभद्र' हे किर्लोस्करांच्या नाटकांचे संपादन त्यांनी केले तसेच 'गाभारा' मधून वि. स. खांडेकरांच्या साहित्याचा अभ्यास अशी साहित्यसंपदा त्यांची आहे. **१९३७:-** दलित साहित्याच्या चळवळीला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करुन देणारे विचारवंत, साहित्यिक गंगाधर विठोबाजी पानतावणे यांचा जन्म. 'धम्मचर्चा', 'किल्ले पन्हाळा ते किल्ले विशाळगड', 'मूकनायक', 'साहित्य शोध आणि संवाद' मिळून पंधराहून अधिक वैचारिक व समीक्षणत्मक पुस्तके प्रसिध्द. याखेरीज 'दलित आत्मकथन', 'दलित साहित्य : चर्चा आणि चिंतन', 'लोकरंग', 'स्त्री आत्मकथन', 'महारांचा सांस्कृतिक इतिहास' ही काही महवपूर्ण संपादने आणि अस्मितादर्शक या नियत कालिकाच्या संपादनाची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली होती. **१९५१:-** साहित्यिक डॉ.एस एम कानडसे यांचा जन्म. त्यांच्या साहित्यसंपदेत आनंद यादव-साहित्य आणि जीवन (आनंद यादवांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास आत्मभानाची सूक्तशिल्पे), '(मराठीतील एकवीस कवितांची आस्वादक समीक्षा ओले मूळ भेदी)', '(तुकारामांच्या अभंगांचा कालोचित अन्वयार्थ पीळ आणि पैलू)', '(रा रं बोराडेंच्या समग्र साहित्याची मीमांसा)', 'संत तुकाराम : चरित्र आणि कार्य (संतश्रेष्ठ तुकारामांच्या जीवन कार्याचा सुबोध परामर्श संकल्प-भाग १,२,३ संपादित पाठ्यपुस्तके) तसेच 'सृजन पैलू' या त्रैमासिकाचे ते संपादक आहेत. **१९९९:-** स्वातंत्र्यसेनानी आणि जुन्या पिढीतील एक ख्यातनाम पत्रकार रामचंद्र विठ्ठल उर्फ रामभाऊ मिसळ यांचे निधन. **२००६:-** संतसाहित्याचे अभ्यासक, लेखक, समीक्षक निर्मलकुमार जिनदास फडकुले यांचे निधन. २० पुस्तके आणि सात सपांदित पुस्तके अशी त्यांची ग्रंथसंपदा आहे. 'लोकहितवादी-काळ आणि कर्तृत्व', 'संतकवी तुकाराम-एक चिंतन', 'संत चोखामेळा आणि समकालीन संतांच्या रचना', 'संतांचिया भेटी', 'संतवाणीचे झंकार ही संतसाहित्याचा अभ्यास मांडणारी पुस्तके', तसेच 'समाज परिवर्तनाची चळवळ-काल आणि आज', 'चिंतनाच्या वाटा', 'साहित्यातील प्रकाशधारा'हे त्यांचे महत्त्वाचे लेखसंग्रह, याशिवाय 'प्रबोधनातील पाऊलखुणा', 'निवडक लोकहितवादी' या संपादित पुस्तकांतुन एकोणिसाव्या शतकाच्या सुधारणाविषयक चळवळीचा आढावा त्यांनी घेतला आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२८ जून

१) श्री. विश्वनाथ दामोदर जोशी
अलिबाग, २८-६-१९३३

२) श्री. प्रभाकर अनंत वेंगुर्लेकर
वाडगाव, २८-६-१९४३

३) श्रीम. रूपा रघुनाथ कुलसंगे
पोयनाड, २८-६-१९५७

४) श्री. दिलीप दत्तात्रय प्रधान
पिंपळभाट, २८-६-१९५२

५) श्री. कमलाकर वेंकटेश स्वामी
अलिबाग, २८-६-१९६३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**स्व. धनवंती मनजी पटेल, स्मरणार्थ, अलिबाग.**

# बांधकाम विभागाचा कंपनीला दणका

## नेरळ-कशेळे येथील रस्त्याची खोदाई नियमबाह्य केल्याचा ठपका

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील नेरळ-कशेळे या राज्यमार्गाच्या बाजूने ओएफसी केबल टाकण्याचे काम सार्वजनिक बांधकाम खात्याने थांबवले आहे. त्यामुळे संबंधीत कंपनीला चांगलाच दणका बसल्याचे बोलले जाते.**



नवी मुंबई येथील दिनेश इंजिनिअरिंग कंपनीला केबल टाकण्याची परवानगी दिली होती. मात्र संबंधित कंपनीने रस्त्याच्या बाजूला असलेली साईडपट्टी खोदून त्यात केबल टाकण्याचा प्रकार सुरु केला होता. बांधकाम विभागाने त्याला आता चाप लावला आहे.

नेरळ-कशेळे मार्गावर सार्वजनिक बांधकाम विभागाने काही कोटी खर्च करून रस्त्याचे नेरळ कोल्हारे, जिते तसेच वाकस या भागात काँक्रीटीकरण तर अन्य भागात डांबरीकरण केले आहे. या रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कोकण भवन येथील अधीक्षक अभियंता कार्यालयाने परवानगी दिली आहे. संबंधीत कपनीने काँक्रीट रस्त्याच्या बाजूने जेसीबी मशीनचे साहाय्याने खोदकाम करून केबल टाकण्याचा प्रकार सुरु केला. त्याबद्दल रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीने या कंपनीच्या मनमानी विरोध आक्षेप घेतला. रस्त्याची अनेक वर्षे भराव करून बनवलेली साईड पट्टी खोदून त्यात केबल टाकण्याचे काम केले जात असल्याने अनेक ठिकाणी वाहने त्या केबलच्या खड्ड्यात कोसळत आहेत. त्याचवेळी अवजड वाहने रस्त्याच्या कडेने किंवा खोदकाम करून भराव टाकलेल्या रस्त्याने गेल्यावर रस्त्याला तडे पडत आहेत.

या सर्व प्रकारची पहाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता संजीव वानखेडे यांनी केली. त्यानंतर नवी मुंबई येथील दिनेश इंजिनिअरिंग यांना एका पत्राद्वारे केबल टाकण्याचे काम थांबवण्याचे आदेश दिले. त्याचवेळी या रस्त्यावर काँक्रीट रस्त्यालगत खोदकाम केल्याने रस्त्याची झालेली नुकसान भरपाई देण्याचे किंवा खराब झालेला रस्ता बनवून देण्याचे आदेश या नोटिशीत दिले आहेत. तसेच रस्त्याच्या कडेला केलेले खोदकाम हे तातडीचे भराव टाकून बुजविण्याचे आदेश दिले आहेत. केबल टाकण्यासाठी दिलेल्या परवागनीनुसार ठराविक अंतरावरच केबल टाकण्यात यावी, असे सूचित केले आहे.

याबाबत संबंधीत कंपनी काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# खारघरमध्ये ३०० कडुलिंब रोपांची लागवड

**। पनवेल । वार्ताहर**

नेचर क्युअर आणि योगा ग्रुप, खारघरतर्फे 'मेरी धरा, मेरी जिम्मेदारी', या उपक्रमाअंतर्गत खारघर सेक्टर-२७ परिसरात ३०० कडुलिंब रोपांची लागवड करण्यात आली आहे.

खारघरमधील सेंट्रल पार्क लगत सिडकोद्वारे उभारल्या जाणाऱ्या कार्पोरेट पार्कसाठी भूखंड राखीव आहे. तसेच सदर परिसर निसर्गरम्य असून, चार पदरी रस्ते आणि मोकळ्या पदपथावर खारघरवासीय सकाळी-संध्याकाळी या परिसरात कसरतीसाठी तसेच चालण्यासाठी येत असतात. प्राचीन काळापासून कडुलिंबाच्या झाडाचा उपयोग आयुर्वेदिक औषधीमध्ये केला जातो. कडुलिंबाला सर्व रोग निवारण वृक्ष असे देखील संबोधले जाते. कडुलिंब वृक्ष मानवी शरीर, त्वचा आणि केसांना खूप फायदेशीर असून, एक रक्तशोधक औषधी वनस्पती असल्यामुळे 'नेचर क्यूअर आणि योगा ग्रुप'च्या पदाधिकारी बिंदूसरी जैस्वाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी २२ जून रोजी खारघर सेक्टर-२७ परिसरातील मोकळे भूखंड, रस्ते दुभाजक आणि रस्त्यालगत ३०० कडुलिंब रोपांची लागवड केली.

दरम्यान, लागवड केलेली कडुलिंब झाडांची रोपे तीन ते चार फूट उंचीची आहेत. या कडुलिंब रोपांची पावसाळ्यात वाढ होणार आहे. लागवड केलेल्या कडुलिंब वृक्ष रोपांची देखभाल देखील करण्यात येणार आहे, असे बिंदूसरी जैस्वाल यांनी सांगितले.

## रेल्वे स्टेशन चौकीसमोरील सर्कल येथे आढळला मृतदेह

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल रेल्वे स्टेशन चौकीसमोरील सर्कल या ठिकाणी एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ६५ ते ७० वर्षे, रंग सावळा, उंची अंदाजे साडेपाच फुट, चेहरा उभट, अंगाने सडपातळ, डोक्याचे केस वाढलेले, दाढी बारीक वाढलेली व मिशी वाढलेली असून कपाळ मोठे, नाक सरळ, डाव्या डोक्याच्या वरील बाजूस जुनी जखमेची खुण आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दुरध्वनी २७४५२३३३ किंवा सहा.पो.निरीक्षक सुषमा पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीसांनी केले.

# पाभरे हायस्कूलमध्ये छत्रपती शाहू महाराजांची जयंती

## पुस्तक प्रदर्शन, वृक्ष वाटपाने कार्यक्रम झाला रंगतदार

**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा येथील केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालय आणि श्री स्वामी विवेकानंद संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल पाभरे येथे छत्रपती शाहू महाराजांच्या जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन आणि उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले.



छत्रपती शाहू महाराज ही अशी व्यक्ती होती की, ज्यांनी राजा असूनही दीन-दलित आणि शोषित वर्गाचे दुःख समजून त्यांच्याशी सदैव जवळीक ठेवली असल्याचे मान्यवरांनी स्पष्ट केले. राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जुन १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात झाला. कोल्हापूरचे राजे चौथे शिवाजी यांची राणी आनंदीबाई यांनी १८ मार्च १८८४ रोजी त्यांना दत्तक घेतले व ते कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती शाहू महाराज झाले. वाचनालयाने छत्रपती शाहू महाराजांच्या जयंती निमित्त भरविलेल्या पुस्तक प्रदर्शनांत राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, छत्रपती शाहू स्मृति दर्शन, राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूम नामें, शाहू, शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज, राजर्षी शाहू कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे, शाहू छत्रपती आणि लोकमान्य टिळक एक शोध, राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे, यांनी महाराष्ट्र घडविला अशी विविध ग्रंथसंपदा आयोजकानी प्रदर्शनात ठेवली होती. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, तालुका हिंदू समाजाचे अध्यक्ष महादेव पाटील, वैष्णवी कळबसकर, रेणूका पाटील, दिपाली पालवे, तालुका कृषी अधिकारी राजेंद्र ढंगारे, पर्यवेक्षक नरेश जामकर, सुजय कुसळकर, कृषी सहाय्यक अशोक सानप, अंगणवाडी सेविका कमला दिघीकर, सुनंदा आंबेतकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# बसस्थानक उभारण्याची प्रवाशांची मागणी

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग-वडखळ मार्गावर कार्लेखिंड येथे वडखळला जाणाऱ्या प्रवाशांसाठी बसस्थानक उभारण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.



अलिबाग-वडखळ मार्गावरील कार्लेखिंड येथे वडखळ बाजूला जाताना एसटी बसचा महत्वाचा एसटी बस थांबा असल्याने याठिकाणी रेवस व मांडवा भागातील हजारोंच्या संख्येने प्रवाशी मुंबई, पुण्याकडे व इतर कोणत्याही ठिकाणी जाताना कार्लेखिंड येथील एसटी बस थांब्यावरूनच प्रवास करताना दिसतात.

मात्र कार्लेखिंड याठिकाणी अलिबाग बाजूला जाणाऱ्या प्रवाशांसाठी बसस्थानकाची काही वर्षांपूर्वी नवीन इमारत उभी केली आहे, हि इमारत गलिच्छ असून या ठिकाणी अनधिकृतपणे दुचाकी उभ्या केलेल्या असतात, यामुळे प्रवाशांना या बसस्थानकाचा उपयोग करण्यात अडचण येत आहे. शिवाय या बसस्थानकाचा वडखळ बाजूला जाणाऱ्या प्रवाशांना कोणताही फायदा होत नाही, असे स्पष्ट दिसत आहे. कारण पलीकडच्या बाजूला उभे राहून अलिबागकडून अचानक सदर बस थांब्याजवळ आलेली बस पकडण्यासाठी रस्ता ओलांडून जावे लागते. यावेळी प्रवाशांना आपल्या सामानसुमानासह व कुटुंब कबिल्यासह अचानक रस्ता ओलांडून येताना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी प्रवाशी पलिकडे न जाता याच बाजूला भर उन्हात तर कधी भर पावसात बसची वाट पाहत ताटकळत उभे असतात.

एसटी थांब्यावरून दररोज शाळेतील विद्यार्थी, आजारी रुग्ण, वयोवृद्ध, लहान मुले यांच्यासह प्रवास करणारे प्रवाशी यांना नाईलाजास्तव बसची वाट बघत ताटकळत उभे रहावे लागत असून त्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे, शिवाय याठिकाणी बसण्याची तरी सोडा निदान उभे राहण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याने रस्त्यावर उभे राहावे लागत असल्याने अपघाताचा धोका देखील जास्त आहे. याबाबत प्रशासनाविरोधात प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे.

यासाठी सरकारने व संबंधित प्रशासनाने याची दखल घेऊन कार्लेखिंड याठिकाणी वडखळ बाजूकडे जाणाऱ्या बस थांब्यावर बसस्थानक उभारण्याची प्रवाशांनी मागणी जोर धरू लागली आहे.

## बळीराम निंबाळकर यांना मातृशोक

**पाली :** सुधागड तालुका मराठा समाज संघटनेचे कार्याध्यक्ष बळीराम निंबाळकर यांच्या मातोश्री कै. कमळावती विष्णू निंबाळकर यांचे शनिवार (दि.२२) जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

यांच्या अंत्यविधीसाठी सुधागड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील शैक्षणिक,



सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील व्यक्ती तसेच मित्रमंडळी यांची मोठी उपस्थिती होती. कै.कमलावती निंबाळकर यांच्या निधनाने निंबाळकर कुटुंबियांवर मोठी शोककळा पसरलेली आहे. त्यांचा दशक्रिया विधी सोमवार १ जुलै रोजी उद्धर येथे होणार असून उत्तर कार्य गुरुवार ४ जुलैला धुंडीविनायक नगर पाली येथील राहत्या घरी होणार आहे.

# भिसेगाव रस्त्यावर जलवाहिनीचे खड्डे

## १५ दिवसात कोणतीही कार्यवाही नाही

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत नगरपरिषद हद्दीमधील गुंडगे ते भिसेगाव या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात झाडे रस्त्यावर कलंडली आहेत. त्याचवेळी पालिकेने ठिकठिकाणी जलवाहिन्या खोदून ठेवल्या आहेत. त्यामुळे या सर्व प्रश्नांवर मार्ग काढावा आणि वन विभागाने तेथील झाडांचा प्रश्न निकाली काढावा, अशी मागणी करणारे निवेदन ॲड. भावना मोरे यांनी दिले आहे.



कर्जत नगर परिषद हद्दीतील गुंडगे रोड जुने एसटी स्टॅण्ड परिसरात रहाणाऱ्या माजी नगरसेविका पुष्पा दगडे यांच्या घराच्या समोर गेले १५ दिवसांपासून जलवाहिनी खोदून ठेवली आहे. पाईप लाईन शोधण्यासाठी गुंडगेकडे जाणारा वाहतुकीचा मुख्य रस्ता फोडून ठेवला आहे. या रस्त्यावर फॉरेस्ट ऑफिस, गुड शेफर्ड इंग्रजी शाळा, त्याचप्रमाणे अनेक रहिवासी राहातात. अनेक चारचाकी व दोन चाकी वाहने या रस्त्यावरून ये-जा करतात. रात्रीच्या वेळी वाहन चालकाला खड्डा समजून न आल्यास अपघात होवून जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यातच पाईप लाईनमध्ये कोठे समस्या आहे. याची माहिती नसल्याने या परिसरात पाण्यचा प्रश्न निर्माण झाला आहे.

तर याच भागात रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात झाडे रस्त्याकडे कलंडली आहेत. त्यात प्रामुख्याने बांबूच्या जातीची झाडे रस्त्याकडे आली असल्याने तेथील एका रस्त्यावरील प्रवास बंद झाला आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी अपघात होण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे वन विभागाच्या कार्यलयाच्या आजूबाजूला ही झाडे रस्त्याकडे आली आहेत. ती सर्व झाडे तोडण्यात यावीत, अशी मागणी निवेदन देऊन केली आहे.




# कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर

**। कोर्लई । वार्ताहर ।**

आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ व अवैध मानवी तस्करी विरोधी दिनानिमित्ताने मुरुडच्या विधी सेवा समिती मुरुड व वकील संघ मुरूड यांच्या संयुक्त विद्यमाने सर एस. ए. हायस्कूलमध्ये कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

अंमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम, त्यासंबंधी कायदे, अवैध मानवी तस्करी त्याविरुध्दचे कायदे याबद्दल सर. एस. ए. हायस्कुल येथील इयत्ता १२ वीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यक्रमामध्ये ॲड. अजित चोगले यांनी अंमली पदार्थांचे दुष्परिणाम, अवैध मानवी तस्करी, त्यासंबंधी कायदे याबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. ॲड. डी. एन. पाटील यांनी अन्नाचा अधिकार, प्रदुषण मुक्त हवा व पाण्याचा अधिकार याबाबत मार्गदर्शन केले तर ॲड. मनाली सतविडकर यांनी बालमजुर, बालमजूर कायद्याबाबत माहिती दिली.

कार्यक्रमासाठी जिल्हा विधी सेवा समिती अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश घनश्याम तिवारी (क. स्तर) यांनी अंमली पदार्थ सेवनाचे नविन पिढीतील तरूणांवर होणारे दुष्परिणाम, त्यामुळे होणाऱ्या आरोग्याच्या समस्या, समाजावर होणारा परिणाम, त्यासाठीचे कायदे व शिक्षा याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच नागरीकांचे अन्न अधिकार, प्रदुषण मुक्त हवा व पाण्याचा हक्क, बालमजुर संबंधी कायदे यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

मुरुड वकील संघाचे सचिव ॲड. डी. एन. पाटील, ॲड. अजित चोगले, ॲड. मनाली सतविडकर तसेच मुख्याध्यापक सरोज राणे आदी उपस्थित होते.

# नागोठण्यात विद्यार्थिनींना मोफत पासचे वाटप

**। नागोठणे । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य सरकारने राज्यात अनेक वैविध्यपूर्ण योजना सुरु केल्या आहेत. यातीलच एक महत्वाकांक्षी अशी शालेय मुलींसाठी योजना असलेल्या अहिल्याबाई होळकर मोफत विद्यार्थिनी पास योजनेअंतर्गत कोएसोच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील एस.पी. जैन ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थिनींना मोफत पासचे वाटप नागोठणे स्थानकाच्यावतीने करण्यात आले.



रोहा आगाराचे वाहतूक निरीक्षक अजिंक्य रोहेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्या प्रमुख उपस्थितीत एस.पी.जैन ज्यनिअर कॉलेजमध्येच संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला वरिष्ठ लिपिक संदीप गायकवाड, नागोठणे स्थानकाचे वाहतूक नियंत्रक प्रसाद पाटील, कॉलेजच्या प्राचार्या राधिका ठाकूर, शिक्षक के.एन. पवार, एन.एन. गायकवाड, इतर शिक्षक वृंद व विद्यार्थीनी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# कोयना प्रकल्पग्रस्तांचे लक्षवेधी आंदोलन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कोयना प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने येत्या पावसाळी अधिवेशनात शुक्रवार २८ जून रोजी कोयना वसाहत असलेल्या प्रत्येक तहसील कार्यालयासमोर एक दिवसीय लक्षवेधी आंदोलन करण्यात येणार आहे. तशाच प्रकारे पनवेल येथे सुद्धा अखिल कोयना पुर्नवसाहत सेवा संघातर्फे एक दिवसीय लक्षवेधी आंदोलन करण्यात येणार आहे.

कोयना जलविद्युत प्रकल्पासाठी सन १९६० साली एकूण १०५ गावांचे पुर्नवसन करण्यात आले. त्यावेळी पुर्नवसन कायदा अस्तित्वात नसल्याने प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी, नागरी सुविधा इत्यादी बाबींपासून वंचित रहावे लागेल. तत्कालीन मंत्री महोदयांच्या आश्वासनांवर कोणतीही तक्रार न करता ज्या-ज्या ठिकाणी जागा उपलब्ध झाली. त्या ठिकाणी स्थलांतरित झालेल्या वसाहती अद्याप सुविधांपासून वंचित राहिलेल्या आहेत. त्यातील रायगड जिल्ह्यात ४७ वसाहती, ठाणे जिल्ह्यात १४ वसाहती, पालघर जिल्ह्यात ८ वसाहती, रत्नागिरी जिल्ह्यात ४ वसाहती, सातारा जिल्ह्यातील पाटण व जावळी तालुक्यात एकूण ६७ वसाहती आहेत. या वसाहतींचा प्रश्न अद्याप मार्गी लागला नाही आहे. या संदर्भात वारंवार मुख्यमंत्री, पुर्नवसन मंत्री, प्रशासनाकडे मागण्यांचे निवेदन देवून सुद्धा कोणतीही कारवाई झालेली नाही.

# उरणच्या समृध्द वारी परंपरेचं पाचवं वर्ष

**। उरण । वार्ताहर ।**

**देशातल्या वारकरी परंपरेचा परमोच्च बिंदू असलेल्या पंढरीच्या विठ्ठलाच्या नवीन शेवा येथून निघणाऱ्या वारीचं हे पाचवं वर्ष. या वारीची सुरुवात गुरुवारपासून झाली. नवीन शेवा येथून निघालेल्या वारीची गुरुवारी नगरप्रदक्षिणा पार पडली.**

या नगरप्रदक्षिणेत शेकडोंच्या संख्येने वारकरी सहभागी झाले होते. याच रात्री नवीन शेवा येथे गोविंदमहाराज यांचं कीर्तन पार पडलं. रात्रीचं जागर भजनही सादर झालं. शुक्रवारी आळंदी येथे अनंत महाराज पारगावकर धर्मशाळेत दोन दिवसांच्या मुक्कामात संस्थांच्या विद्यमाने कीर्तन सादर होईल. तर शनिवारी गोविंद महाराज यांचं कीर्तन पार पडेल. रविवारचा वारीचा मुक्काम हा पुणे दिघीकॅम्प छावणी येथे असेल. तिथे कीर्तन सेवेचे मानकरी नितीन महाराज म्हात्रे हे असतील. वारीचा सोमवारचा मुक्काम हडपसर येथे असून, तिथे कीर्तनसेवा सातारा येथील कीर्तनकार सानिका महाराज तसेच राजेंद्र महाराज केंद्रे हे पार पाडतील. वारीचा मंगळवारचा मुक्काम हा वडकी सासवड येथे स्वामी मंदिरात होणार आहे. तिथे नामदेव महाराज जायेभाये हे पोथीवाचन करणार आहेत तर गणेश महाराज आणि नामदेव महाराज यांची कीर्तन सेवा पार पडेल.

वारीचा बुधवारचा मुक्काम सासवड दिवे येथे नामदेव महाराज झेंडे यांच्या निवासी असणार आहे. इथली कीर्तनसेवा विवेक महाराज शिरसाठ हे सादर करतील. गुरुवारी वारीचं प्रस्थान जेजुरी येथे बेलसर फाटा येथे असणार आहे. येथे सातारा येथील सानिका महाराज यांची कीर्तन सेवा पार पडणार आहे. शुक्रवारी वारीचं प्रस्थान हे वाल्हे कामठवाडी येथे असणार आहे. दिघोडे येथील अक्षय महाराज कोळी यांची कीर्तन सेवा होणार आहे. शनिवार आणि रविवारी वारीचा मुक्काम लोणंद येथे असेल. या दोन मुक्कमात सानिका महाराज आणि राजेंद्र महाराज केंद्रे यांची कीर्तनं होतील. तिथे पहिलं उभं रिंगण पार पडल्यावर सोमवारी वारीचं प्रस्थान हे तरडगाव येथे होईल. तिथे दिघोडा येथील अक्षय महाराज कोळी हे कीर्तन करतील. मंगळवारच्या फलटण निवासी करंजा येथील अक्षय महाराज कोळी यांची कीर्तन सेवा पार पडेल. बुथवारी धरड इथल्या मुक्कमात गणेश महाराज आणि नामदेव महाराज यांचं प्रवचन आणि करंजा येथील अक्षय महाराज यांचं कीर्तन पार पडेल. गुरुवारी नातेपोते येथे पालखीचं प्रस्थान असेल. तिथे नांदेड येथील कीर्तनकार नामदेव महाराज जायेभाये यांची कीर्तनसेवा पार पडेल. शनिवारच्या वेळापूरच्या मुक्कामात सातारा येथील चांबरे महाराज यांचं कीर्तन होईल. रविवारी शेगाव मुक्कामात राजेंद्र महाराज केंद्रे यांचं कीर्तन होईल. सोमवारच्या वाखरी येथील मुक्कामात नितीन महाराज म्हात्रे यांचं कीर्तन पार पडेल. मंळवारी पंढरपूर निवासी उरणमधील बुजूर्ग कीर्तनकार देवजी महाराज बाबर केळीवाले यांचं कीर्तन होईल. आषाढीच्या एकादशीचं विठ्ठल दर्शनानंतरचं कीर्तन राजेंद्र महाराज केंद्रे करणार आहेत. गुरुवारी द्वादशीच्या क्षिरापतीचं कीर्तन सकाळ ९ वाजता नितीन महाराज म्हात्रे करतील आणि प्रसादानंतर वारकरी उरणला परततील.

उरणमधून निघणाऱ्या या वारीला उरणचे माजी आमदार मनोहर भोईर यांचं बहुमोल सहकार्य असतं. याशिवाय चंद्रकांत घरत, नारायण भोईर, किसन म्हात्रे, सतीश भोईर, पंडित घरत,

कमलाकर पाटील, गणेशनाथ महाराज अशा असंख्य दानशुरांकडून सहकार्य मिळत असल्याचं नितीन महाराज आणि राजेंद्र केंद्रे महाराज यांनी सांगितलं.

निवडक

## पनवेलमध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल शहर परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. अनोळखी इसमाचे अंदाजे वय २५ ते ३० वर्षे, अंगाने सडपातळ, डोक्याचे व दाढीचे काळे व वाढलेले, अंगात काळ्या रंगाचा टी-शर्ट व उजव्या हातावर इतर भाषेतील तीन अक्षरे गोंदलेली आहेत. या इसमाबाबत अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे ०२२-२७४५२३३३ किंवा सपोनि प्रकाश पवार यांच्याशी संपर्क साधावा.

## तळा पोलिसांकडून जनजागृती

**तळा :** जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाचे औचित्य साधून तळा महाविद्यालयात पोलीस ठाण्याच्या वतीने नशामुक्त भारत अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी तळा पोलीस ठाणेचे पोलीस हवालदार सुरेश पवार, पोलीस नाईक महेश मढवी, प्रा. एन सी.पाटील, प्रा. एन. टी.मचे, प्रा. पी. पी.कसबे आदी मान्यवर उपस्थित होते. नशामुक्त भारत अभियान, जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त तळा पोलीस ठाण्याच्यावतीने विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली.

## सामाजिक न्याय दिन साजरा

**आगरदांडा :** अंजुमन इस्लाम जंजिरा पदवी महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य डॉ. साजीद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि ग्रंथालय विभाग यांच्यातर्फे वक्तृत्व स्पर्धा आणि निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली. याप्रसंगी डॉ. फिरोज शेख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून सामाजिक न्यायचे महत्त्व पटवून दिले. त्याचबरोबर प्रा. अल्ताफ फकीर यांनी सूत्रसंचालन केले.

## शाळेला वॉटर फिल्टरची भेट

**रोहा :** रोहा येथे वॉटर फिल्टरची भेट देण्याचा कार्यक्रम उत्साहात संपन्न करण्यात आला. साई फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्यावतीने व डॉ.असिफ कासकर यांच्या विशेष प्रयत्नांतून सदरचे वॉटर फिल्टर भेट देण्यात आले आहे.या वॉटर फिल्टर मशीनचे उद्घाटन निलेश वारंगे व घनश्याम कराळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संदीप विचारे, विनोद पाटील, अश्विनी विचारे, संदेश गमरे, तौसिफ येरूणकर, मारूती तुपकर, हिरामण फणसे, विजय वेळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## अजगराला दिले जीवदान

**शिहू :** गडब गावात अजगर असल्याचा दूरध्वनी सर्पमित्र नागेश गावंड यांना मिळताच तात्काळ सात फूट लांब व ८ किलो वजनाच्या अजगराला पकडून वनपरीक्षेत्र अधिकारी वडखळ स्वाती डुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली जंगल अधिवासात सोडण्यात आले आहे. सध्या पावसाळा सुरु असून बिळात पाणी जाऊन सरपटणारे प्राणी आश्रयासाठी लोकवस्तीत शिरत आहेत अशा वेळी त्यांना हानी न पोचवता जवळच्या सर्पमित्राला पाचारण करण्याचे आवाहन केले.

# नाचणी लागवडीत उदासीनता

## मेहनत, खर्चाच्या तुलनेत अल्प मोबदला; कृषी विभाग ठरतोय अपयशी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**कोकणातील जमिनीत नाचणीचे पीक चांगले येते. नाचणीचे पीक मानवी शरीरासाठी अत्यंत पौष्टिक असल्याने दैनंदिन जेवणात त्याचा समावेश करण्यासाठी कृषी विभागाकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहे. मात्र, नाचणी पिकासाठी करावी लागणारी मेहनत, जंगली प्राण्यांचा उपद्रव आणि मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे रायगड जिल्ह्यात नाचणीच्या लागवडील क्षेत्रात फारशी वाढ झाल्याचे दिसत नाही.**



यंदाच्या खरीप हंगामासाठी २, ८७६ हेक्टर क्षेत्रावर कृषी विभागाने नाचणी पिकाच्या लागवडीचे नियोजन केले आहे; मात्र, प्रत्यक्षात इतक्या क्षेत्रावर नाचणी पिकाची पेरणी करण्याची शेतकऱ्यांनी तयारीच दर्शवली नाही. नाचणीला प्रोत्साहन मिळावे, म्हणून कृषी विभागाने फार्महाऊस मालकांना नाचणीची पेरणी करावी, असे आवाहन केले होते.

कोकणातील दऱ्या-खोऱ्यात नाचणी, वरी या तृणधान्याचे पीक पूर्वी मुबलक प्रमाणात घेतले जायचे. कालांतराने शेतकऱ्यांनी विकलेल्या जमिनीवर फार्महाऊस बांधण्यात आले. फार्महाऊसमध्ये असलेल्या मोकळ्या जागेत नाचणीची लागवड करण्यासाठी कृषी विभागाकडून मार्गदर्शनही करण्यात आले होते. यासाठी दोन हजार किलो नाचणीचे बियाणे मोफत वाटण्यात आले. इतके प्रयत्न करूनही रायगडमधील शेतकऱ्यांनी नाचणीचे पीक घेण्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

संयुक्त राष्ट्राने २०२३ वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष घोषित केले होते. त्यानुसार यंदाही जिल्ह्यातील अतिदुर्गम गावापर्यंत पौष्टिक तृणधान्याची लागवड ते प्रक्रियेपर्यंत मार्गदर्शन केले जात आहे. रायगड जिल्ह्यात आंबा आणि काजू लागवडीला प्रोत्साहन मिळण्यापूर्वी नाचणी, वरी या तृणधान्याची लागवड मोठ्या प्रमाणात केली जायची. अपार मेहनत आणि अल्प मोबदला यामुळे हे क्षेत्र घटले असून जेमतेम दोन हजार हेक्टरपर्यंत आले आहे.

जिल्हा व तालुकास्तरिय कार्यशाळा, पीक प्रात्यक्षिके, पीक संग्रहालय, लागवड पद्धती, ग्राम कृषी सभेमध्ये पौष्टिक तृणधान्याबाबत चर्चा व मार्गदर्शन, पौष्टिक तृणधान्य प्रक्रियाबाबत प्रशिक्षण, आहार तज्ज्ञांशी संवाद, विविध शाळांमध्ये निबंध व चित्रकला स्पर्धांचे आयोजन, महिला बचतगटांसाठी पाककला स्पर्धा व प्रशिक्षण कार्यक्रम, पथनाट्य इत्यादी उपक्रम राबवण्यात आले होते. नाचणी, वरीचे पीक मुख्यतः आदिवासी कुटंब घेतात. या धान्याला चांगली किंमत मिळवून देण्याचा प्रयत्न कृषी विभागाचा आहे.

कुपोषण समस्या व पोषणमूल्य सुधारण्यासाठी मिलेटचा आहारात वापर वाढवणे, त्यांचे लागवडक्षेत्र वाढवणे, त्यांच्या उपयुक्ततेबाबत समाजात जनजागृती केली जात आहे. नवीन पिढीच्या व लहान मुलांच्या आवडीचे पदार्थ जसे की, ब्रेड, बिस्किट, केक, इडली, डोसा, चकली इत्यादी पदार्थ पौष्टिक तृणधान्यावर प्रक्रिया करून बनवता येतात. असे पदार्थ बनवून त्यांचा आहारात समावेश वाढविणे आवश्यक आहे. तृणधान्य वर्षाच्या निमित्ताने शाळांमध्ये पालकांना माहिती देण्यात आली.

> **साधारण ३० वर्षांपूर्वी रायगड जिल्ह्यात नाचणी हे पीक भात पिकानंतर दुसऱ्या क्रमांकाने घेतले जायचे. हे पीक घेण्यासाठी येथील जमीन, वातावरण अनुकूल आहे. मात्र कराव्या लागणाऱ्या कष्टामुळे शेतकरी पुन्हा नाचणी पिकाकडे येऊ शकलेले नाहीत. ज्या ठिकाणी पूर्वी हे पीक घेतले जात असे, तेथे तयार झालेल्या फार्महाऊसमध्ये नाचणीचे पीक घेण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले आहे.**
>
> **– सतीष बोराडे, प्रकल्प संचालक, आत्मा.**

# सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्तीची मागणी

**। सुधागड । वार्ताहर ।**

पाली नगरपंचायत परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद व नादुरुस्त असल्याने केवळ सीसीटीव्ही कॅमेरे शोभेची वस्तू असल्यासारखे झाले आहे. याचा नागरिकांना व पोलीस प्रशासनास खोळंबा झाला असल्याने परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्ती करण्यात यावे, अथवा त्याजागी नवीन चांगल्या दर्जाचे कॅमेरे बसविण्यात यावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते कपील पाटील पाली नगरपंचायत मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करणार आहेत.



कपील पाटील यांनी माहित देताना सांगितले की, परिसरातील ९० टक्के सीसीटीव्ही कॅमेरे हे नादुरुस्त अवस्थेत असल्याने नागरिकांसह पोलीस प्रशासनाला गुन्ह्यांची उकल करण्यास अडचणीचे ठरत आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याने भुरट्या चोऱ्या, साखळी चोर यांचे फावते आहे. सार्वजनिक ठिकाणे, संवेदनशील अडगळीच्या जागा, हटाळेश्वर चौक आदी चौकातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# तिघर येथे तरुणावर हल्ला; १२ जणांवर गुन्हे दाखल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

जमीनीच्या वादातून कर्जत तालुक्यातील जामखिंड तिघर येथे एका तरुणावर जीवघेणा हल्ला करण्यात आला.त्यांची गाडी अडवून हा हल्ला केला आहे. या हल्ल्यात तो तरुण गंभीर जखमी झाला असून मारेकऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना मंगळवारी सकाळी घडली आहे.मारेकरी हल्ला करून पळून जाण्यातही यशस्वी ठरले आहेत.

अनिल देशमुख असे या जखमींचे नाव आहे. मुंबई येथील खासगी रुग्णालयात ते उपचार घेत आहेत. पळसदरी ग्रामपंचायत मधील तिघर या गावातील एकाच कुटुंबातील लोकांचे वडिलोपार्जित जमिनीचे वाद गेली काही वर्षे सुरु आहेत.याच वादातून यापूर्वी तीन गुन्हे कर्जत पोलीस ठाण्यात दाखल झाले आहेत, अनिल हरिश्चंद्र देशमुख यांच्या घरी जाऊन जीवे ठार मारण्याची धमकीदेखील दिली होती. २५ जून रोजी सकाळी अनिल देशमुख हे त्यांच्या गाडीमधून नांगुर्ले येथुन भिलवले मार्गे जात होते. दरम्यान एक कार त्यांच्या गाडीसमोर आडवी घालण्यात आली. त्या गाडीमधून पाचजण उतरले.त्यांनी देशमुख यांच्याशी शाब्दीक वाद घालत त्यांच्यावर लोखंडी रॉडने वार केले. त्यांच्यासोबत असलेले रोहित सागर मोहिते यांच्या डाव्या खांद्यावर देखील लोखंडी रॉडच्या सहाय्याने फटका मारून त्यांना जखमी करण्यात आले. त्यानंतर मारेकऱ्यांनी तेथून पळ काढला. देशमुख यांच्यावर झालेल्या हल्ल्यामुळे ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना कर्जत येथील उपजिल्हा रुग्मालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यानंतर अधिक उपचारासाठी मुंबई येथील खासगी दवाखान्यात त्यांना रवाना करण्यात आले.

याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात मारेकऱ्यांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली. १२ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून ते फरार आहेत.त्यामध्ये गजानन बाळाराम देशमुख, योगेश वसंत देशमुख, जयेंद्र गजानन देशमुख, प्रशांत सूर्यकांत देशमुख, विवेक विश्वनाथ देशमुख, श्रीराम बाळाराम देशमुख, सचिन गजानन देशमुख सर्व राहणार तिघर तसेच होंडा सिटीमधून आलेले पाच अनोळखी गुंड यांचा समावेश आहे. गुन्हा दाखल होऊन कित्येक तास उलटून गेले आहेत. मात्र अद्याप कर्जत पोलिसांनी मारेकऱ्यांना पकडले नसल्याने नाराजी सुर उमटत आहेत.

देशमुख आणि मारेकरी हे एकमेकांचे नातेवाईक असून एकाच गावात राहत असून त्यांचेमध्ये वडिलोपार्जित नांगुर्ले येथील जागेवरुन वाद असून त्या वादामुळे आरोपी यांनी यापूर्वी फिर्यादी यांचे घरी जावून त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली होती. तसेच फिर्यादी यांचे ओळखीचा आदित्य कदम यांना देखील आरोपी यांनी फिर्यादी यांच्यावर हल्ला करुन त्यांना मारणार आहोत अशी धमकी दिली होती.

रायगड जिल्ह्यात जमीनीच्या वादावरून जीवघेणा हल्ला होण्याच्या घटना वाढत आहेत. स्थानिक पातळीवर मारेकऱ्यांवर नियंत्रण नसल्याने हल्ले करण्याचा प्रकार घडत आहे.

जिल्ह्यात अशा घटनांमधून कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचा धोका वाढण्याची भिती सर्वसामान्य नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या घटनेकडे गांभीर्याने लक्ष देऊन गुंडगिरी करणाऱ्यांवर अंकुश ठेवावा अशी मागणी होत आहे.

## जानकी पोटफोडे यांचे निधन

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील शिरवली गावचे रहिवासी तथा रा.जि.प.चे माजी उपाध्यक्ष व नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या संस्थेचे संस्थापक -अध्यक्ष रा.ग. पोटफोडे (मास्तर) यांच्या सौभाग्यवती



जानकी रामचंद्र पोटफोडे यांचे मंगळवारी (दि.२५) वयाच्या ९० व्या वर्षी राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगे, सहा मुली, नातवंडे पतवंडे असा मोठा गोतावळा असून त्यांचे दशक्रियाविधी गुरूवारी (दि.४) तर अंतिम धार्मिकविधी रविवारी (दि.७) शिरवली येथे होणार आहेत.

# पावसाला सुरुवात होताच वीज गायब

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन शहरासह संपूर्ण तालुक्यामध्ये पावसाला सुरुवात झाल्याबरोबर काही वेळातच महावितरणची वीज गायब होत असल्याचे चित्र आहे. खंडित झालेला वीज पुरवठा पूर्ववत होण्यास पाच ते सहा तासांचा कालावधी लागत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळल्याचे पाहायला मिळत आहे.

अनेक वेळा वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर महावितरणचे अभियंता फोन उचलण्यास टाळाटाळ करतात. जरी फोन उचलला तरी काम चालू आहे थोड्या वेळात वीज पुरवठा सुरळीत होईल असे उत्तर देतात.

मात्र प्रत्यक्ष पहाटेच्या वेळी वीज गेल्यानंतर वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी कोणतेही महावितरणचे अभियंता किंवा कर्मचारी दिवस उजाडल्याशिवाय त्या ठिकाणी जात नसल्याने नागरिकांना सहा ते आठ तास अंधारामध्ये राहावे लागत आहे. अद्याप पावसाळा सुरू झाला असला तरी सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडत नसल्याने वीज पुरवठा वारंवार खंडित होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. महावितरण कडून पावसाळ्याअगोदरची कामे करण्यासाठी अनेक वेळा संपूर्ण दिवसभर वीज पुरवठा खंडित करण्यात येतो. यामध्ये लाईनच्या बाजूला असलेल्या झाडांची कटिंग, त्याचप्रमाणे पावसाळ्या अगोदर करण्यात येणाऱ्या दुरुस्तीच्या कामांसाठी वीज पुरवठा खंडित केला जातो.

एवढी सगळी कामे महिन्यातून चार वेळा दिवसभर वीजपुरवठा बंद ठेवून करून सुद्धा पावसाला सुरुवात झाल्यानंतर वीज पुरवठा का खंडित होतो? याचे उत्तर महावितरणचे अभियंता देऊ शकत नाहीत. सहा ते आठ तास वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर अनेक मोबाईल कंपन्यांची मोबाईल सेवा देखील खंडित होत असते. त्यामुळे व्यावसायिकांचे, नागरिकांचे विविध कामासाठी नेटवर्क नसल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

महावितरण नागरिकांकडून बिल वसूल करताना स्थिर आकार, वीज आकार, वहन आकार, इंधन समायोजन आकार, वीज शुल्क, विज विक्रीकर, व्याज, निव्वळ थकबाकी, समायोजित रक्कम, व्याजाचीथकबाकी,एकूणथकबाकी इत्यादी प्रकार ग्राहकांकडून वसूल करत असतात. त्याशिवाय शंभर युनिट यावरती वेगवेगळे विजेचे दर लावले जातात. वीज ग्राहकांकडून एवढ्या मोठ्या रकमेची लूट करून सुद्धा ग्राहकांना योग्य प्रकारे वीज पुरवठा करण्यामध्ये महावितरण पूर्णपणे अकार्यक्षम ठरत आहे.

# जासई-गव्हाण रस्त्यावर चिखलाचा बसला थर



**। उरण । वार्ताहर ।**

सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत असणाऱ्या जासई-गव्हाण रस्त्यावर सततच्या डेब्रिज व अवजड वाहनांच्या रहदारीमुळे पहिल्या पावसात रस्त्यावर चिखलाचा खच साचून खड्डे पडले आहेत. रस्त्यावर पडलेल्या चिखलामुळे व खड्ड्यांमुळे मोठा अपघात होण्याची भीती वर्तविली जात आहे.

या मार्गावर मुंबई परिसरातील डेब्रिज भरलेल्या वाहनांची रेलचेल सुरू आहे. जनतेच्या सोयीसाठी बनविण्यात आलेल्या रस्त्यावर मोठंमोठे खड्डे पडू लागले आहेत. पावसाळ्यात रस्त्यावर चिखल मातीचा खच पडला आहे. त्यामुळे या मार्गांवरून मार्गक्रमण करणाऱ्या वाहनांना, मोटारसायकलस्वार, रिक्षा चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून रात्री अपरात्री अपघात होण्याचा धोकाही निर्माण झाला आहे.

## कल्पना देसाई यांचे निधन

**माणगाव :** माणगाव येथील ज्येष्ठ पत्रकार तथा तालुका पत्रकार संघाचे सचिव व शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबीर सेवाभावी संस्था माणगावचे सल्लागार सचिन देसाई व सामाजिक कार्यकर्ते संदेश



देसाई यांच्या मातोश्री कल्पना देसाई यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी (दि.२७) पहाटे ३:१५ वाजता राहते घरी माणगाव येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने देसाई परिवारावर शोककळा पसरली आहे. कल्पना देसाई शांत व मनमिळाऊ स्वभावाच्या व्यक्तिमत्त्व होत्या.

# पोखरवाडी सोंडेवाडी धबधब्यावर जाण्यास बंदी

**। रसायनी । वार्ताहर ।**

खालापूर तालुक्यातील पोखरवाडी सोंडेवाडी येथील धबधब्यावर पर्यटकांना पाण्यात उतरू नये, असा विनंती म्हणून बंदीचा बॅनर खालापूर पोलिसांच्या मार्फत स्थानिक पोलीस पाटील यांनी लावला आहे.

शुक्रवारी ( दि.२१ ) मुंबई येथून पावसाळी ट्रेक आणि पोहण्याचा आनंद घेण्यासाठी १८ ते २६ वयोगटातील ३७ मुले मुली सोंडेवाडी येथून ट्रेक करून आल्यावर मोरबे धरणाच्या वरच्या बाजूस असलेल्या व माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या या पोखरवाडी-सोंडेवाडी बंधाऱ्यावर दुपारी पोहण्यासाठी उतरली असता यातील आकाश धर्मदास माने, रणथ मधू बंदा, एकलव्य उमेश सिंग आणि ईशान दिनेश यादव यांचा बुडून मृत्यू झाला आहे.या चौघांच्या मृत्यूची नोंद खालापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



हा पोखरवाडी सोंडेवाडी धबधबा सदृश्य तलाव अतिशय धोकादायक असून येथे पाण्याचा भोवरा तयार होतो. त्याच्या जवळपास गेल्यावर, जाणाऱ्याचा मृत्यु अटळ आहे, असे स्थानिक ग्रामस्थांकडून समजते.

येथे स्थानिक तरुण, तरुणी किंवा स्थानिक पर्यटक कधीच जात नाहीत. सन २०२१ या वर्षी ३, सन २०२२ या वर्षी १ तर सन २०२४ या वर्षी म्हणजे अद्याप पावसाळा सुरू झाला नाही, तरीही चार तरुणांचा बुडून मृत्यू झाला आहे.

गेल्या चार वर्षांत आठ जणांनी मृत्यूला कवटाळले आहे. या तलावाच्या ठिकाणी येण्याचा मार्ग एकच असला तरी वाटा अनेक आहेत, स्थानिक ग्रामस्थ, पोलीस यंत्रणा, महसूल विभाग आणि पोलीस पाटील हे वारंवार विनंती करून देखील बेफिकीर पर्यटक कुणाचेच ऐकत नाहीत, आणि शेवटी मृत्यूच्या दाढेत जातात, असे निराश होऊन खालापूर पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंत ठोंबरे पाटील यांनी सांगितले.

अद्याप पर्यटकांना कायदेशीर येण्यावर बंदी घालण्यात आली नाही, पण येणाऱ्या पर्यटकांनी आपला आनंद साजरा करताना स्थानिक यंत्रणेला त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी असे आवाहन पोलीस पाटलांनी केले आहे.

## उसरोलीतील झाड धोकादायक

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरूड -सुपेगाव-रोहा रस्त्यावर उसरोली येथील झुकलेले झाड अवजड वाहन चालकांची डोकेदुखी ठरत असून वेळप्रसंगी अपघाताची शक्यता लक्षात घेऊन शासनाच्या संबंधित विभागाने लक्ष पुरवून योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून उसरोली रस्त्यावरील झाड धोकादायक ठरत असून याठिकाणी अवजड वाहन धडकून अपघाताला सामोरे जावे लागत असल्याचे प्रकार घडले आहेत.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे.
मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८

● नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १. वेटर, २. नाश्ता बनवणारा कूक, ३. हाऊस कीपिंग, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसअॅप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५

● वाडगाव फाटा येथे कॉटेजमध्ये काम करण्यासाठी जोडपे पाहिजे.
मो.९८२२९३८४४४

● Data Entry साठी Ladies पाहिजे Tally ERP 9 येणे आवश्यक. त्वरित संपर्क साधावा. कामाचे ठिकाण : धरमतर चेक पोस्ट कामाची वेळ : ९ ते ५.३०, पगार: ८,००० ते १०,०००. संपर्क : ९०२८७४९२९२ /८३९०५५१९३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# पोलादपूरच्या नदीपात्रात ‘वलगन’

## ...अन् चढणीचे मासे पकडण्यासाठी मासेखाऊंची लगबग!

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

**तालुक्यात बुधवारी मुसळधार पाऊस पडून नाल्यांची पात्र दुथडी भरून नदीकडे वाहू लागली असून अनेक गावांमध्ये या नदीपात्रालगतच्या चढणीवर नाल्या-शेतात अंडी-पिल्ले सोडण्यास येणाऱ्या माशांची वलगन लागली आहे. ग्रामस्थ तसेच आदिवासी बांधवांनी ही वलगनीची गोड्या पाण्याची मासळी पकडण्यासाठी नेहमीप्रमाणे सुसज्जता ठेवली आहे. मासेखाऊंची चढणीचे म्हणजेच वलगनीचे मासे पकडून मुसळधार पावसाची अनोखी मजा साजरी करण्यासाठी लगबग सुरू आहे.**

पोलादपूर तालुक्यात सावित्री, कामथी, घोडवनी, चोळई आणि ढवळी या पाच प्रमुख नद्यांची पात्रं अद्याप पुरेसा पाऊस न पडल्याने उथळच दिसत आहेत. गेल्या दोन दिवसांत तालुक्यात पावसाचा जोर वाढल्यामुळे नाल्यांची पात्रं दुथडी भरल्यानंतर नदीकडे येणाऱ्या ओहोळातून तसेच शेतीच्या पाण्याच्या पाटातून विरूध्द दिशेने शेताकडे जाऊन उथळ व संथ पाण्यात अंडी अथवा पिले सोडणाऱ्या माशांनी अंडी सोडण्यासाठी उलटा प्रवास करण्यास वलगन असे गावाकडे म्हणतात. खेडेगावांतील ग्रामस्थ आणि आदिवासी बांधवांनी ही वलगनीची मासळी पकडण्यासाठी पागविणे, बांधणं



घालणे, खोचेरे मारणे आणि जाळयात पकडण्याचे विविध मार्ग अवलंबिले आहेत. तालुक्यातील प्रदुषणरहित गोड्या पाण्यातील वांब, सकला, कटला, मुरगी, अहिर, खडशी, भिंग, मळयाचे मासे, शिंगटया, टोलकी, डाकू मासा, शिवड्याचे पातं असे मासे तसेच किरवी किंवा मुरी, मुठे (पांढरी खेकडी), झिंगे, चिंबोरी (लाल खेकडी)हे अष्टपाद उभयचर मांसाहारी खवैय्यांच्या जीभेवर वेगळीच अवीट चव रेंगाळत ठेवत असल्याने परगावी राहणाऱ्या पोलादपूरकरांना त्यांच्या ग्रामीण जीवनाच्या आठवणीच्या काळातील वलगनीचे विशेष वाटत असते.

मळयाचे मासे मुंबईकर चाकरमान्यांना एसटी बसेस तसेच खासगी प्रवासी गाडयांमधून तळून डब्यांतून पाठविली जात असून बस मुंबईत पोहोचण्यापूर्वीच हे डबे घेण्यासाठी चाकरमानी मुंबईतील संबंधित स्थानकावर अथवा थांब्यावर वाट पाहात असतात. महाड व पोलादपूर तालुक्यातील मत्स्यप्रेमी खवय्ये आवर्जून कापडे बुद्रुकच्या नरवीर तानाजी मालुसरे कमानीखाली बसलेल्या आदिवासी महिलांकडून अव्वाच्या सव्वा दर मोजून वेगवेगळ्या प्रकारचे मासे खरेदी करताना दिसत आहेत.

# स्थानिकाचा प्रामाणिकपणा

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमधील स्थानिक व्यावसायिक धोंडू बाबू कदम यांना शारलोट तलाव परिसरात पर्यटकाची बॅग रस्त्याच्या कडेला सापडली. कोणतीही अभिलाषा न बाळगता कदम यांनी सदर बॅग माथेरान पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यांच्याकडे सुपूर्द करून आपल्या प्रामाणिकपणाने दर्शन घडविले आहे.

धोंडू बाबू कदम यांचा एको पॉईंट येथे छोटेसा स्टॉल आहे. बुधवार, दि.२६ रोजी सायंकाळी त्यांना एको पॉईंटहून शारलोट तलावाकडे जात असताना त्यांना रस्त्याच्या कडेला एक बॅग सापडली. त्यांनी लागलीच ती बॅग घेऊन पोलीस ठाणे गाठले आणि ती बॅग सहायक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यांच्या स्वाधीन केली. यामध्ये पैशाचे पाकीट आणि दोन मोबाईल होते. सदरची बॅग डोंबिवली येथील पर्यटकाची असल्याचे तपासात समजले.



अलीकडच्या काळात समाजातील प्रामाणिकपणा, खरेपणा हरवत चालला असल्याचे चित्र अनेकवेळा दिसत आहे. तसेच दिवसेंदिवस दुर्मिळ होत असलेला माणसातला जाणतेपणा आणि माणुसकीदेखील कमी होत चालली आहे. असे असताना माथेरानमधील या स्थानिक स्टॉलधारकाने रस्त्यात मिळालेली बॅग परत केली. त्यांच्या या निःस्वार्थीपणाचे आणि प्रामाणिकपणाचे सर्व माथेरानमधून कौतुक होत आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक श्री. रोशन जगदिश हरपूडे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**

**मौजे पोखरकरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु-पै |
|---|---|---|---|
| २७ | ४ | ०-८०-००<br>पो.ख. ०-०१-०० | ०-८१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:- २,''लक्ष्मी सदन'' जुने एस.टी. स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

---

प्रोगेस जमा दि.

अर्जदार तर्फे वकिल श्री.अमित म. देशमुख
निशाणी नंबर
दिवाणी चौ. अर्ज नं ३५/२०२४

**माणगांव येथिल मे दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सा़ो यांचे न्यायालयात**

श्रीमती मंजिरी अरुण सायगांवकर
वय ५९ वर्षे, धंदा-काही नाही. — अर्जदार
रा. ५२०/२, वरदायिनी को-ऑप.
हौसिंग सोसायटी, कोलाड माध्यमिक शाळेसमोर, कोलाड,
ता. रोहा, जि. रायगड.

विरूद्ध

कोणीही नाही — सा.वाला

सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की, वरील अर्जदाराचे पती श्री. अरुण रामभाऊ सायगांवकर यांचे दि.२२/०७/२०२३ रोजी मौजे कोलाड, ता. रोहा, जि. रायगड येथे निधन झाले आहे.

कै. अरुण रामभाऊ सायगांवकर यांचे मृत्यु समयी त्यांचे नावे एक्टीव्हा ६जी डीएलएरक के. एमएच ०६/सीएच-५३१८ ही दुचाकी गाडी होती तसेच ही ब्रीझा व्हीएक्सआय गाडी क्र. एमएच ०६/ सीडी-३५३९ ही चारचाकी गाडी होती व आहे. कै. अरुण रामभाऊ सायगांवकर यांस अर्जदार हीच कायदेशीर वारसदार असल्यामुळे सदरच्या मिळकती (दोन्ही गाड्या) अर्जदार यांचे नांवे होण्याबाबत वारस दाखला मिळण्याकरता अर्जदारांनी में, कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदार यांचे मागणीप्रमाणे त्यांस के. अरुण रामभाऊ सायगांवकर यांचे कायदेशीर वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तीची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून एक महिन्याच्या आत किंवा दि.२५/०७/२०२४ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलामार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. जर विहीत मुदतीत कोणाचीहि हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येऊन मे. न्यायालय वारस दाखला देण्याचा हुकूम अर्जदार यांचे लाभात करेल याची नोंद घ्यावी.

आज दि. ३१ माहे ०६/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**अधिक्षक** / **सही/-** / **दिवाणी न्यायालय व. स्तर माणगांव**

**क. लिपीक.** / **सही/-** / **दिवाणी न्यायालय व स्तर माणगांव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-बोरघर, ता.अलिबाग, जि. रायगड, येथील गट नं. ४७, एकूण क्षेत्र ०-२२-५० हे. आर., आकार ५.१२ रू. पै. ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक गणेश अनंत चोगले रा. बी५०२, मैत्री आयकॉन, प्लॉट नं. ३५/३६ सेक्टर १९, खारघर, नवि मुंबई ४१०२१० यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २७/०६/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो, ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेंत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे मालक श्रीम. विजया रामचंद्र धोत्रे, श्री. किरण रामचंद्र धोत्रे, श्री. महेंद्र रामचंद्र धोत्रे, सर्व रा.नांदगांव, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून आमचे अशिलाने कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खाली लिहीले प्रमाणे,

**मौजे नांदगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे-आर | आकार रू.=पैसे |
|---|---|---|---|
| ५ | ० | ०-६५.८ | १=३४ |

यापैकी आमचे मालकीची ०-३९.८ हेक्टर ही मिळकत तदंगभूत सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा.

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकीत दान, गहाण, बक्षीस, साठेकरार, करार मदार, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कळावे.

तारीख:-२८-०६-२०२४.

**श्री.विवेक अशोक धनवी,**
बी.कॉम., एल्एल्.बी., ॲडव्होकेट,
ऑफिस गाळा नं.७ सुमनराज को.ऑप.
हौऊ. सोसायटी, पाटीलआळी, दहिवली,
ता. कर्जत, जि. रायगड,
मोबाईल नंबर-९०११७३६००२.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील नमुद केलेली जमिन मिळकत ही महसुल रेकॉर्ड प्रमाणे ७/१२ उताऱ्यावरील खालील नमुद केलेल्या जमिन मालकांच्या नावावर असुन त्यांच्या मालकीच्या व कब्जेवहीवाटीच्या असून ती निर्वेध बोजारहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस त्यांनी दिलेला आहे. तसेच सदर जमिन मालकांशी खाली नमुद केलेल्या सर्व्हे नंबरची जमिनीशी व्यवहाराची बोलणी झालेली असून सदरचे जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

| जमिन मालकांचे नाव : | भूमापन क. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. एकूण क्षेत्र | आकारणी | खरेदी करावयाचे क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| श्री. मनोहर विठठल दरे<br>श्री. संतोष विठठल दरे<br>श्रीमती.रजनी रविंद्र बहीरे | ५६/६/ब<br>सामाईक<br>क्षेत्र | ०.२४.५०<br>०.००.५० पो.ख<br>२५ एकूण क्षेत्र | ०.२६ | १५ गुंठे |

वर नमुद मिळकतीच्या बाबतीत कोणतीही व्यक्ती यांचा इतर कसलाही हीतसंबध, अधिकार, ताबा, पोटगीहक्क, कब्जा, मालकी, वहीवाट, बयाणा, साठेकरार, विक्री, लीज, लीन, चार्ज, मृत्यूपत्र, बोजा, कर्ज, विक्री, तारण, दान बक्षिस कुळवहीवाट कुलमुखत्यार खरेदीविक्री, भाडेपट्टा दावा, मनाई हुकूम, वारसाहक्क, अथवा कोणताही हीतसंबध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे कालावधी मध्ये आपले कागदपत्रासहीत पुराव्याचे सोबत तसे खालील सही करणार वकील यांचे पत्त्यावर प्रत्यक्ष लेखी कळवावे.

वरील दिलेल्या मुदतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या लेखी हरकती आल्या नाहीत तर वरील नमुद मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क हितसंबंध व अधिकार नाहीत असे समजण्यात येईल व विद्यमान मालकांचे मालकी हक्क कायदेशिर निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहेत असे गृहित धरून व समजून आमने अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या हरकतीस आमचे अशिलांवर अगर सदर जमिन मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यायी येणेप्रमाणे सदरची जाहीर नोटीस दिली असे.

ठिकाण: कर्जत,
दिनांक : २७/०६/२०२४

सही /-
**ॲड. निलांबरी गिरीश देशमुख.**
योगेश निवास, रेव्हेनू कॉलनी
मुद्रे बुद्रुक, कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१.
मो.नं. ०९८१९७२२०२८

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे नांदईपाडा, अलिबाग, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची मिळकत १) रामचंद्र बाळू पेढवी २) संगिता हरीश्चंद्र पेढवी ३) अलका हरीश्चंद्र पेढवी ४) उलका हरीश्चंद्र पेढवी ५) संगिता महादेव भोईर ६) संगिता काशिनाथ भोईर ७) भारती संदीप पाटील ८) प्रतिमा अतिश पाटील ९) कविता अंबरनाथ पाटील १०) सुजल गणेश शेळके अ.पा.क.वडील गणेश गोपाळ शेळके ११) राघोबा गोविंद पाटील १२) निलीमा महादेव पाटील १३) अतुल महादेव पाटील १४) जमुना बळीराम पाटील १५) अनिता आत्माराम पेढवी १६) नयना गणेश डोलकर १७) चंद्रकांत गोविंद पेढवी १८) संगिता संदिप भोईर १९) उदय तुकाराम पाटील २०) उमेश तुकाराम पाटील २१) स्वाती शरद मिठे २२) लक्ष्मी लक्ष्मण भोईर २३) रोहिणी दयाराम पेढवी २४) दत्ताराम लक्ष्मण भोईर २५) ललिता दिपक पाटील २६) सतीश लक्ष्मण भोईर २७) बबन हरी भोईर २८) हर्षा हरेश पेटवी २९) स्मिता प्रेमनाथ पेढवी ३०) निलीमा नागेश पाटील ३१) दिक्षा दिपक पेढवी ३२) अश्विनी शांताराम पाटील ३३) कामिनी स्वप्नील किणी यांच्या मालकीची असून सदर मिळकतीतील अविभाज्य हिस्सा सदर मिळकतीच्या वरील विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर मिळकतीतील त्यांचा अविभाज्य हिस्सा पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या वरील विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| नांदईपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड | ९८ | ०-०६-००<br>पो.ख ०-०१-००<br>एकुण ०-०७-०० | ०.८५ |

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तीनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांका पासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २७/०६/२०२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मांडला. ता मुरुड, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची मिळकत श्री. निलेश गोविंद काठे याच्या मालकीची असून सदरील मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकाकडून माझे अशिलानी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| मांडला.ता. मुरूड, जि.रायगड | १९१/१/९ | ००-३३-४०<br>पो.ख ००-०७-६०<br>एकुण ००-४१ -०० | ०.३४ |

सदर मिळकतींपैकी दुसरेपक्षी यांचे मालकीचे ०-२१-०० हे. आर. क्षेत्र आकार ०.१८ रू.पै.व तिंतील ग्रुप ग्रामपंचायत मांडला हमीतील मौजे महाळुगे खुर्द येथील मालमत्ता नं. ५१६, क्षेत्र २४.६ x १७.६ एकणू ४३२.९ चौ. फूट (४०.२३ चौ.मी.) यासह.

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तीनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांका पासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २७/०६/२०२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु. नांदाईपाडा पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीनें कळविण्यात येते की, माझे अशिल १) श्री. रविशंकर रघुनाथ मयेकर २) श्री. लक्ष्मीकांत रघुनाथ मयेकर, ३) श्री. कुलदीप सुशिलकुमार मयेकर, रा. मु. गिरगाव, मुंबई यांनी त्यांचे मालकीची खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी विक्री करणेंचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | सर्व्हे/गट क्र. | एकूण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| १. | तलवडे, ता. अलिबाग | १००/१ | ०.५५.६० | १.८६ |
| २. | तलवडे ता. अलिबाग | १००/३ | १.०१.४० पैकी उत्तरेकडील ०.१३.०० | ३.३९ |

वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे. तरीही वर नमूद मिळकतीत कोणाचाही हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, चार्ज, पोटगी, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकती संदर्भात कोणत्याही न्यायालयात वाद प्रलंबित असल्यास अथवा अन्य कोणताही दंगदावा असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विक्री करणेंचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वास कळावे,

अलिबाग
ता. २७/०६/२०२४

**ॲड. विजय विठोबा पाटील,**
F-१०४, पहिला मजला, ॲकॉन्स एन्क्लेव्ह,
डॉ. पुष्पलता शिंदे हॉस्पीटल समोर, चेंढरे अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेंत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी अलिबाग नगरपरिषदेचे हद्दीमधील सिटी सर्व्हे नंबर ९२३अे/१, ९२३अे/२ - आणि के९२३अे एकत्रित क्षेत्र १४९२.५३ चौरस मीटर या मिळकतीवर बांधलेल्या सिद्धिविनायक को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.या इमारतीमधील बी विंग मधील पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रमांक बी३ क्षेत्र ६२० चौरस फूट (५७.६२ चौरस मीटर) या क्षेत्राची निवासी सदनिका श्री. गणेश नथोबा आठवले यांचे मालकीची आहे. श्री. गणेश नथोबा आठवले वर नमूद सहकारी सोसायटीचे भागधारक सदस्य आहेत. सदर निवासी सदनिका विकत घेण्याबाबत आमचे अशिलांची श्री. गणेश नथोबा आठवले यांचेबरोबर बोलणी चालू आहेत. सदर व्यवहार अंतिमतः ठरविण्यापूर्वी वर नमूद मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीची/ वित्तसंस्थेची काही जडजोखीम असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही नोटीस देण्यांत येत आहे.

तरी, सदर निवासी सदनिकेबाबत इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख : २८/०६/२०२४.

सही/-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा को ऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग, रायगड.

---

निधी नोंदणी
जावक क्रमांक/१४५०/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, रायगड विभाग, कल्पतरु
इमारत, मुख्य पोस्ट ऑफीस जवळ,
अलिबाग, रायगड, रायगड, रायगड,
२१/०६/२०२४ रायगड

**चौकशीची जाहीर नोटीस**

एस.आर.एन.क्रमांक: RGD/१२३१२/१८/२४
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक.२३५/२४
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री राधा कृष्ण मंदिर ट्रस्ट चिकणी बाबत ।
न्यासाचा पत्ता :- व्दारा सुभाष राजाराम खेडेकर, चिकणी, काशीद, मुरुड, रायगड, मुरुड, काशीद
अर्जदार सुभाष राजाराम खेडेकर,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | Murti | 180000.00 |
| 2 | Brass Bells | 3000.00 |
| 3 | Table | 40000.00 |
| 4 | Chairs | 35000.00 |
| 5 | Plates | 30000.00 |
| 6 | Bowls | 30000.00 |
| 7 | Pots Large | 20000.00 |
| 8 | Big Fan | 14000.00 |
| 9 | Pat/Chaurang | 3000.00 |
| 10 | Puja Material Plate, Bowl, Copper | 1000.00 |
| 11 | Palkhi | 12000.00 |
| 12 | Donation Box | 2500.00 |
| 13 | Tube Light | 1400.00 |
| 14 | Closet | 3000.00 |
| 15 | Brass Timing | 50000.00 |
| 16 | Avoid Brass | 3000.00 |
| 17 | Dholki Naal | 3000.00 |
| 18 | Grates | 35000.00 |
| 19 | Utensils Brass Pan And Lid | 70000.00 |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. ५३५९००/- मात्र
(अक्षरी रुपये पाच लाख पस्तीस हजार नऊ शे मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | chikani | ५८ | ९२.९३ | ० | ० | ९२७३९५.०० |

(ब) स्थावर मिळकत: रोख रु. ९२७३९५/- मात्र
(अक्षरी रुपये नऊ लाख सत्तावीस हजार तीन शे पंच्याण्णव मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक २१-०६-२०२४ रोजी दिली.

सही/-
**अधिक्षक (प्र)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**रायगड**


# मुंबई विद्यापीठ

(नॅक श्रेणी ए + +, सीजीपीए ३.६५ गुण)

**दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (सीडीओई)**

(पूर्वीची दूर व मुक्त अध्ययन संस्था - आयडॉल)

डॉ. शंकर दयाळ शर्मा भवन विद्यानगरी कलिना सांताक्रूझ (पू.) मुंबई ४०००९८



**ऑनलाईन प्रवेश**
**अधिसूचना २०२४-२०२५**

**पदवी अभ्यासक्रम**
**प्रवेशासाठी संकेतस्थळ : https://idoloa.digitaluniversity.ac/Login**

**प्रथम वर्ष : बी. ए., बी. कॉम., बी. कॉम. (अकाऊंटिंग अँड फायनान्स), बी. एससी (माहिती तंत्रज्ञान), बी. एससी. (संगणकशास्त्र)**

**प्रवेशाचे वेळापत्रक** २६ जून २०२४ ते ३१ जुलै २०२४

**खालील प्रवेशाच्या तारखा लवकरच जाहीर करण्यात येतील**

- **द्वितीय व तृतीय वर्ष : बी.ए., बी.कॉम., बी.कॉम.** (अकाऊंटिंग अँड फायनान्स), **बी.एससी** (माहिती तंत्रज्ञान), **बी.एससी.** (संगणकशास्त्र)
- **भाग–१ एनईपीनुसार : एम.ए.** (इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी), **एम.ए.** (भूगोल), **एम.ए.** (शिक्षणशास्त्र), **एम.ए.** (मानसशास्त्र), **एम.ए.** (संज्ञापन आणि पत्रकारिता), **एम.ए.** (जनसंपर्क), **एम.कॉम.** (ॲडव्हान्स अकाऊंटन्सी), **एम.कॉम.** एम.कॉम. (बिझनेस मॅनेजमेंट), **एम.एस.सी.** (गणित), **एम.एस. सी.** (माहिती तंत्रज्ञान), **एम.एस. सी.** (संगणकशास्त्र).
- **भाग–२ : एम.ए.** (इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी), **एम.ए.** (भूगोल), **एम.ए.** (शिक्षणशास्त्र), **एम.ए.**(मानसशास्त्र),**एम.ए.**(संज्ञापन आणि पत्रकारिता),**एम.ए.**(जनसंपर्क),**एम.कॉम.** (ॲडव्हान्स अकाऊंटन्सी),**एम.कॉम.**(बिझनेस मॅनेजमेंट), **एम.एस.सी.**(गणित), **एम.एस.सी.**(माहिती तंत्रज्ञान), **एम.एस.सी.** (संगणकशास्त्र)
- **पीजीडीएफएम (सेमिस्टर १ आणि २ )** *(या अभ्यासक्रमाला मुंबई विद्यापीठाने मान्यता दिली आहे)

**एमएमएस आणि एमसीए (प्रथम वर्ष)** प्रवेश परीक्षेच्या अर्जांच्या स्वीकृतीची तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल.

**सर्व अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन प्रवेशाचे तपशील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत:**
**https://mu.ac.in/distance-open-learning**

सही/-
**डॉ. संतोष राठोड**
प्रभारी संचालक

दिनांक : २१ जून, २०२४
पीआरओ/सीडीओई/१/२०२४

- Email : info@idol.mu.ac.in
- facebook : https://www.facebook.com/idol.uom/,
- Twitter : @idol_uom ,
- Telegram : https://t.me/IDOL_UoM,
- FM Radio : https://play.google.com/store/apps/details?id=com.radio.must,
- Youtube : https://youtube.com/@idoluniversityofmumbai

निवडक

## ‘अजिंक्य’ कामगिरी

**नवी दिल्ली :** भारताचा अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणे गेल्या वर्षभरापासून भारतीय संघातून बाहेर आहे. आता अजिंक्य रहाणे इंग्लंडमध्ये क्रिकेट खेळताना दिसणार आहे. त्याने लीसेस्टरशायर या काऊंटी क्लबशी करार केला आहे. तो या संघाची सध्या चालू असलेल्या काऊंटी चॅम्पियनशीप स्पर्धे दरम्यानच जोडला जाणार आहे. त्यामुळे तो या संघाकडून काऊंटी चॅम्पियनशीप स्पर्धेतील उर्वरित ५ सामने खेळले आणि नंतर लीसेस्टरशायरकडूनच एकदिवयीय चषक ही स्पर्धाही खेळणार आहे.

## धीनीधीचा मोठा पराक्रम

**नवी दिल्ली :** भारताची १४ वर्षीय जलतरणपटू धिनिधी देसिंघू ही आगामी पॅरिस ऑलिंपिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. युनिव्हर्सिटी कोटामधून तिने प्रतिष्ठेच्या क्रीडा महोत्सवाची पात्रता मि ळवली, हे विशेष. तिच्यासोबत श्रीहरी नटराज यानेही याच कोट्यामधून ऑलिंपिकमधील प्रवेश निश्चित केला आहे. नटराज व धिनिधी या जलतरणपटूंना युनिव्हर्सिटी कोटा मिळण्यासाठी जागतिक अ‍ॅक्वेटीक संघाच्या मंजुरीची प्रतीक्षा केली जात होती. अखेर आता दोघांचीही ऑलिंपिकवारी निश्चित झाली आहे.

## खराब खेळपट्टीमुळे पराभव

**फ्लोरिडा :** यंदाच्या टी-२० विश्वचषकातील अफगाणिस्तान विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यामधील उपांत्य फेरीचा सामना ब्रायन लारा स्टेडियमवर रंगला होता. या सामन्यात आफ्रिकेने बाजी मारली. सामना संपल्यानंतर अफगाणिस्तानचे मुख्य प्रशिक्षक जोनाथन ट्रॉट म्हणाले, मला स्वतःला अडचणीत आणायचे नाही आणि मला आंबट द्राक्षांसारे बनायचे नाही. परंतु, ही अशी खेळपट्टी नव्हती ज्यावर कोणीही विश्वचषक उपांत्य फेरी खेळण्यासाठी इच्छुक असेल. या खराब खेळपट्टीमुळे पराभवाला सामोरं जावं लागलं.

## अश्विनचे मोठे वक्तव्य

**नवी दिल्ली :** रविचंद्रन अश्विनने त्याच्या यूट्यूब चॅनलवर सांगितले की, जोनाथन ट्रॉट ड्रेसिंग रूममधून खेळाचा वेग कमी करण्याचे संकेत देत होता आणि त्यानंतर नईब तुटलेल्या झाडाच्या फांदीप्रमाणे मैदानावर कोसळला. प्रत्येकजण त्याला यासाठी शिक्षा झाली पाहिजे असे म्हणत आहे. पण तो आपल्या देशासाठी खेळतोय आणि विश्वचषक क्वालिफायर जिंकण्याचा प्रयत्न करत होता. याआधी अश्विनने त्याच्या ‘एक्स’ अकाऊंटवर ‘गुलबदीन नईबसाठी रेड कार्ड’ असे गमतीने म्हटले होते.

## वॉर्नरची भावनीक पोस्ट

**फ्लोरिडा :** वॉर्नरच्या निवृत्तीनंतर वॉर्नरची पत्नी कँडिस वॉर्नर हिने समाजमाध्यमांवर एक पोस्ट लिहून तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत. कँडिसने लिहिले की, डेव्हिड वॉर्नरने आपल्या देशासाठी सर्वोत्तम क्रिकेट कारकीर्द घडवल्याबद्दल त्याचे अभिनंदन. त्याच्यामुळे आम्हालाही पुढच्या रांगेत बसायला मिळणे हे आमचे सौभाग्य. आम्हाला आता ऑस्ट्रेलियासाठी खेळताना पाहण्याची संधी मिळणार नाही. मात्र, आमच्याबरोबर घरी असशील, या भूमिकेत पाहण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.







# अफगाणांचा लाजिरवाणा पराभव

## दक्षिण अफ्रिकेने रचला इतिहास | पहिल्यांदाच अंतिम सामन्यात धडक

**। त्रिनिदाद । वृत्तसंस्था ।**
**टी-२० विश्वचषकातील पहिला उपांत्य सामना गुरूवारी दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान यांच्यात त्रिनिदादच्या तारुबा येथील ब्रायन लारा स्टेडियमवर खेळला गेला. या स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेने अफगाणिस्तानचा लाजीरवाणा पराभव करत पहिल्यांदाच विश्वचषकाच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे.**

सामन्यात अफगाणिस्तानचा कर्णधार राशिद खानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अफगाणिस्तानच्या फलंदाजीची सुरुवात खुपच खराब झाली. दक्षिण आफ्रिकेच्या घातक गोलंदाजीसमोर अफगाणिस्तानचा संघ अवघ्या ५६ धावांत गडगडला. अफगाणिस्तानकडून अजमतुल्ला उमरझाईने सर्वाधिक १० धावा केल्या. बाकी १० खेळाडूंना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेकडून अतिशय धोकादायक गोलंदाजी पाहायला मिळाली. मार्को जॅनसेन आणि तबरेझ शम्सी यांनी ३-३ बळी घेतले. याशिवाय रबाडा आणि एनरिकने प्रत्येकी २ बळी घेतले. अफगाणिस्तानचा संपूर्ण संघ अवघ्या ११.५ षटकांत गडगडला.

दक्षिण आफ्रिकेने या छोट्या लक्ष्याचा सहज पाठलाग केला. संघाने ८.५ षटकांत १ गडी गमावून ६० धावा केल्या. अफगाणिस्तानचा गोलंदाज फजलहक फारुकीने क्विंटन डी कॉकचा लवकर बळी घेतला असला तरी कर्णधार एडन मॉर्कम आणि रीझा हेंड्रिक्स यांनी ४३ चेंडूत ५५ धावांची खेळी करत संघाला विजयाच्या उंबरठ्यावर नेले. उपांत्य फेरीत नऊ गडी राखून विजय मिळवून दक्षिण आफ्रिका टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारा पहिला संघ ठरत पहिल्यांदाच विश्वचषकाच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे.

### दक्षिण अफ्रिकेचा खडतर प्रवास

**दक्षिण आफ्रिकेसाठी आतापर्यंतचा विश्वचषकातील प्रवास सोपा राहिलेला नाही. दक्षिण अफ्रिकेला आतापर्यंत उपांत्य फेरीत ७ वेळा पराभवाला सामोरे जावे लागले आहे. यापुर्वी उपांत्य फेरीत १९९२ इंग्लंड, १९९९ व २००७ ऑस्ट्रेलिया, २००९ पाकिस्तान, २०१४ भारत, २०१५ न्यूझीलंडकडून तर २०२३ ऑस्ट्रेलियाविरुद्ध पराभव पत्करावा लागला होता.**

### पराभवाला आयसीसी जबाबदार?

**या सामन्यानंतर क्रिकेट तज्ज्ञ आणि समालोचकांनी आयसीसीवर प्रश्न उपस्थित केले आहेत. दरम्यान, इंग्लंडचा माजी क्रिकेटपटू मायकेल वॉनचे एक पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ज्यामध्ये त्याने सामना सुरू व्हायच्या आधी अफगाणिस्तान संघ दोन कारणांमुळे पराभूत होऊ शकतो, असे सांगितले होते आणि तसेच घडले. अफगाणिस्तानविरुद्ध दक्षिण आफ्रिका उपांत्य फेरीच्या सामन्यापूर्वी मायकेल यांनी लिहिले होते की, टी-२० विश्वचषकासाठी अफगाणिस्तान संघ सेंट व्हिन्सेंट येथून सोमवारी रात्री उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला. त्यात त्यांच्या त्रिनिदादला जाणाऱ्या विमानाला ४ तास उशीर झाला होता. त्यामुळे त्यांना सरावासाठी वेळ मिळाला नाही आणि नवीन जागेची सवयही झाली नाही. अशा प्रकारे त्याने नाव न घेता आयसीसीवर निशाणा साधला आहे.**

# ऑस्ट्रियाची प्रथमच नेदरलँड्सवर मात

**। बर्लिन । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रियाने जबरदस्त कामगिरी साधताना नेदरलँड्सला ३-२ असे हरविले, त्याचबरोबर माजी विजेत्या फ्रान्सलाही मागे टाकून युरो करंडक फुटबॉल स्पर्धेच्या ‘ड’ गटात अव्वल स्थान मिळविले आहे. मार्सेल झाबित्सर याने सामन्याच्या ८० व्या मिनिटाला केलेल्या गोलमुळे ऑस्ट्रियाने ३४ वर्षांत प्रथमच नेदरलँड्सवर मात करण्याची किमया साधली. यापूर्वी मे १९९० रोजी डच संघाविरुद्ध ऑस्ट्रियन संघ अखेरच्या वेळेस जिंकला होता.

सामन्याच्या ६व्या मिनिटाला फ्रेंच खेळाडू डॉनयेल मालेन याच्या स्वयंगोलमुळे ऑस्ट्रियाला आघाडी मिळाली होती. उत्तरार्धात नेदरलँड्सने जोरदार टक्कर दिली. कॉडी गाक्पोने ४७ व्या मिनिटास केलेल्या गोलमुळे त्यांनी बरोबरी साधली. नंतर रोमानो श्मिद याच्या भेदक हेडरमुळे ऑस्ट्रियाला ५९ व्या मिनिटास पुन्हा आघाडी घेणे शक्य झाले. ७५ व्या मिनिटाला मेम्फिस डिपाय याच्या गोलला व्हीएआरद्वारे मंजुरी मिळाल्यानंतर नेदरलँड्सने २-२ अशी बरोबरी साधली होती.

ऑस्ट्रियाने ‘ड’ गटात दोन विजय व एका पराभवासह सहा गुण नोंदवून पहिला क्रमांक मिळविला आहे. तर, फ्रान्सने एक विजय व दोन बरोबरींसह पाच गुण नोंदविले आहेत.



# श्रीलंका क्रिकेटला मोठा धक्का

**। कोलंबो । वृत्तसंस्था ।**



टी-२० विश्वचषक स्पर्धेत श्रीलंका क्रिकेट संघाची कामगिरी अगदीच खराब झाली. वनिंदू हसरंगाच्या नेतृत्वात खेळणाऱ्या संघाचे आव्हान पहिल्याच फेरीत संपले होते. त्यांना चार सामन्यांपैकी फक्त एका सामन्यात विजय मिळवता आला होता. यानंतर आता श्रीलंका क्रिकेटला मोठे धक्के बसत आहेत. बुधवारी (दि.२६) महेला जयवर्धनेने श्रीलंकेच्या संघाच्या सल्लागार प्रशिक्षकाच्या पदाचा राजीनामा दिला होता. यानंतर आता ख्रिस सिल्व्हरवूड यांनी श्रीलंका संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला आहे.

त्यांनी त्यांच्या राजीनाम्यामागे वैयक्तिक कारण असल्याचे सांगितले आहे. त्यांनी म्हटले आहे की, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक असताना दीर्घकाळ तुमच्या प्रेमाच्या माणसांपासून दूर रहावे लागते. माझ्या कुटुंबाबरोबर बरीच चर्चा केल्यानंतर आणि जड अंत:करणाने मला वाटते की आता घरी परतण्याची वेळ आहे आणि कुटुंबासमवेत एकत्र वेळ घालवायचा आहे. तसेच, सिल्व्हरवूड यांनी सर्व खेळाडू, प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ आणि श्रीलंका क्रिकेट संघाच्या व्यवस्थापनेचेही आभार मानले.

# रोहितचे इंझमामला प्रत्युत्तर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघ टी-२० विश्वचषक स्पर्धेत आतापर्यंत अपराजित राहिली आहे. दरम्यान, पाकिस्तानी टीव्हीवर बसून माजी क्रिकेटपटू इंझमाम उल हकने भारतीय संघावर बॉल टॅम्परिंगचा आरोप केला होता. यावर भारतीय कर्णधाराने आपल्या शैलीत इंझमामला प्रत्युत्तर दिले आहे. त्याने पाकिस्तानच्या माजी फलंदाजाला मन मोकळे ठेवण्याचा सल्ला दिला. रोहित म्हणाला की, यावर मी तुम्हाला काय उत्तर देऊ? जर तुम्ही दिवसभरात इथल्या परिस्थितीत सामना खेळलात तर खेळपट्टी खूप कोरडी असते त्यामुळे चेंडू आपोआप रिव्हर्स स्विंग होतो. चेंडू फक्त आमचाच नाही तर सर्व संघ खेळत असतानाही रिव्हर्स होते. कधी कधी डोकं वापरणंही गरजेचे असते.



# श्रीलंका दौऱ्याचे वेळापत्रक जाहिर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकानंतर शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली भारताचा युवा संघ झिम्बाब्वे दौऱ्यावर जाणार आहे. त्यानंतर २७ जुलैपासून भारतीय संघाचा श्रीलंका दौराही नियोजित आहे आणि त्याचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. भारतीय संघ या दौऱ्यावर ३ टी-२० व ३ एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळणार आहेत. तसेच, झिम्बाब्वे दौऱ्यावर जाणार संघच कदाचित श्रीलंका दौऱ्यावरील टी-२० मालिकेत खेळेल. पण, आगामी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धा लक्षात घेता एकदिवसीय मालिकेत वरिष्ठ खेळाडूंना खेळावे लागेल. भारतीय संघ श्रीलंका दौऱ्यावर २७, २८ व ३० जुलै रोजी टी-२० सामने खेळेल. त्यानंतर २ ऑगस्टपासून एकदिवसीय मालिकेला सुरुवात होणार असून त्यातील दुसरा व तिसरा एकदिवसीय सामना अनुक्रमे ४ व ७ ऑगस्टला खेळवला जाणार आहे.

## कपिल देवचे मोठे वक्तव्य

**नवी दिल्ली :** भारताचे माजी कर्णधार कपिल देव यांनी रोहित आणि विराटचे नाव घेत मोठे वक्तव्य केले आहे. यावेळी कपिल देव म्हणाले की, रोहित शर्मा विराट कोहलीप्रमाणे कधीही उड्या मारत नाही आणि त्याला त्याच्या मर्यादा माहित आहेत. मला वाटते की, रोहित शर्माला त्याचा खेळ आणि त्याला काय करायचे आहे, हे माहित आहे. रोहितपेक्षा चांगला कोणी नाही. अनेक मोठे खेळाडू येतात आणि स्वत:साठी खेळतात. पण, रोहित एक पाऊल पुढे आहे, तो संपूर्ण संघाला सोबत घेऊन जातो आणि संघातील सर्व खेळाडू त्याच्यावर खूश असतात.

# काऊंटी स्पर्धेत विक्रमांचा पाऊस

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

काऊंटी अजिंक्यपद स्पर्धेत लिसेस्टरशायरच्या लुईस किंबरने सामन्यादम्यान विक्रमांचा पाऊस पाडला आहे. इंग्लंडचा गोलंदाज ऑली रॉबिन्सन याच्या एका षटकात ४३ धावा चोपणाऱ्या किंबरने काऊंटी अजिंक्यपद स्पर्धेतील वेगवान द्विशतकाचा विक्रम नावावर केला आहे. त्याने १०० चेंडूंत द्विशतक पूर्ण केले आणि प्रथम श्रेणी क्रिकेटमधील हे दुसरे वेगवान द्विशतक ठरले.

सामन्यात ससेक्सने पहिल्या डावात ४४२ धावांचा डोंगर उभा केला होता. लिसेस्टरशायरला पहिल्या डावात २७५ धावाच करता आल्याने ससेक्सने १६७ धावांची आघाडी घेतली. ससेक्सच्या सीन हंटने ४, तर रॉबिन्सनने तीन बळी घेतले होते. ससेक्सने दुसरा डाव ६ बाद २९६ धावांवर घोषित करून ४६४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. दुसऱ्या डावात ससेक्सकडून टॉम हायनेस (४५), कार्टर (३१), सीन हंट (६५), अल्सोप (८१) व जेम्स कोलेस (४५) यांनी चांगली फलंदाजी केली.




लिसेस्टरशायरचा संघ ७ बाद १७५ धावा असा गडगडला. तेव्हा लुईस किंबर व बेन कॉक्स यांनी मोर्चा सांभाळला. लुईस किंबरने १०० चेंडूंत द्विशतक पूर्ण केले आणि काऊंटी अजिंक्यपद स्पर्धेतील हे वेगवान द्विशतक ठरले.

### रॉबिन्सनचा नकोसा विक्रम

**क्रिकेटमध्ये आत्तापर्यंत काही मोजक्या खेळाडूंनी सहा चेंडूत सहा षटकार मारत ३६ धावा काढल्या आहेत. पण नुकताच क्रिकेटमध्ये एक इतिहास घडला आहे. इंग्लंडमध्ये चालू सलेल्या काऊंटी अजिंक्यपदाच्या एका सामन्यात एका षटकात तब्बल ४३ धावा गोलंदाजांने खर्च केल्या आहेत, हा गोलंदाज म्हणजे इंग्लंडचा अष्टपैलू ऑली रॉबिन्सन. त्यामुळे त्याच्या नावावर नकोसा विक्रमही नोंदवला गेला आहे.**

## आत्मविश्वास महत्त्वाचा

**। गयाना । वृत्तसंस्था ।**

भारताने सुपर-८ फेरीच्या अखेरच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाला २४ धावांनी पराभूत केले होते. गुरूवारी पत्रकार परिषदेत रोहितला प्रश्न विचारण्यात आला की, ऑस्ट्रेलियाच्या विजयातून सर्वात मोठी गोष्ट कोणती मिळाली. त्यावर उत्तर देताना रोहित म्हणाला की, आमच्यासाठी गेल्या सामन्याबद्दल सांगायचे झाले, तर मला वाटते आत्मविश्वास महत्त्वाचा होता, जो आम्ही फलंदाजी आणि गोलंदाजी दाखवला. मला वाटते तीच अशी एक गोष्ट आहे, जी आम्ही या सामन्यातून पुढे घेऊन जाऊ.

# योगराज सिंग पुन्हा धोनीवर भडकले

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा माजी क्रिकेटपटू युवराज सिंगचे वडील योगराज सिंग हे अनेकदा महेंद्रसिंह धोनीवर टीका करताना दिसत आहेत. यावेळी टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्याबद्दल बोलताना त्यांनी धोनीबद्दल भाष्य केले आहे.

योगराज सिंग हे स्वतः माजी क्रिकेटर असून त्यांनी भारतीय संघातून क्रिकेट खेळलेले आहे. आयसीसी टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत भारताने धडक दिलेली आहे. योगराज सिंग यांनी याआधीही धोनीवर अनेकदा टीका केली आहे.



नुकताच त्यांचा एक मुलाखतीचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. ज्यामध्ये ते विश्वचषक भारतच जिंकणार, असे सांगत आहेत. यावेळी धोनी संघात नाही, त्यामुळे आपण जिंकणारच असे ते मुलाखतकाराला सांगत आहेत. तसेच, गौतम गंभीर आणि रोहित शर्मा यांनीही धोनीच्या विरोधात बोलल्याचा दावा ते करतात.

## हरमनप्रीतकडे नेतृत्वाची जबाबदारी

# भारतीय हॉकी संघाची घोषणा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
**टोकियो ऑलिंपिकमध्ये ऐतिहासिक कास्यपदक पटकावलेल्या भारतीय पुरुष हॉकी संघाची आगामी पॅरिस ऑलिंपिकसाठीची घोषणा बुधवारी करण्यात आली. अनुभवी खेळाडू हरमनप्रीत सिंग याच्याकडे भारतीय हॉकी संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.**

भारतीय हॉकी संघ सध्या बंगळूर पॅरिस ऑलिंपिकची तयारी करीत आहे. पी.आर. श्रीजेश, मनप्रीत सिंग यांचे हे चौथे ऑलिंपिक असणार आहे.




तसेच, कर्णधार हरमनप्रीत सिंग तिसऱ्यांदा ऑलिंपिकमध्ये सहभागी होणार आहेत.

भारतीय हॉकी संघः गोलरक्षक- श्रीजेश पी. आर. बचावपटू- जरनप्रीत सिंग, अमित रोहिदास, हरमनप्रीत सिंग, सुमीत, संजय. मधली फळी- राजकुमार पाल, शमशेर सिंग, मनप्रीत सिंग, हार्दिक सिंग, विवेक सागर प्रसाद. आक्रमक फळी- अभिषेक, सुखजीत सिंग, ललितकुमार उपाध्याय, मनदीप सिंग, गुर्जंत सिंग. पर्यायी खेळाडू- नीलकांता शर्मा, जुगराज सिंग, क्रिशन बहादूर पाठक.

### पाच खेळाडू पहिल्यांदाच ऑलिंपिकमध्ये

**भारताच्या हॉकी संघातील पाच खेळाडू पहिल्यांदाच ऑलिंपिकमध्ये सहभागी होणार आहेत. यामध्ये जरमनप्रीत सिंग, संजय, राजकुमार पाल, अभिषेक व सुखजित सिंग या पाच खेळाडूंचा समावेश आहे.**

### संघाचा ‘ब’ गटात समावेश

**भारतीय हॉकी संघाचा ‘ब’ गटात समावेश आहे. या गटात गतविजेते बेल्जियम, ऑस्ट्रेलिया व अर्जेंटिना या बलाढ्य संघांचा समावेश आहे. तसेच, न्यूझीलंड व आयर्लंड हे देशही याच गटात खेळणार आहेत. ‘अ’ गटामध्ये नेदरलँड्स, जर्मनी, ग्रेटब्रिटन, स्पेन, फ्रान्स व दक्षिण आफ्रिका या देशांमध्ये चढाओढ लागणार आहे.**

# बीसीसीआयचा मोठा निर्णय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

चालू टी-२० विश्वचषकानंतर भारतीय संघ जुलै महिन्यात झिम्बाब्वे दौरा करणार आहे. या दौऱ्यामध्ये भारतीय संघ ५ टी-२० मालिका खेळणार आहे. यादरम्याान बीसीसीआयने वेगवान गोलंदाजांसाठी मोठी घोषणा केली आहे.

भारतीय संघ शभमन गीलच्या नेतृत्वाखाली जुलै महिन्यात झिम्बाब्वेविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. यासाठी बीसीसीआयने अनेक नवीन खेळाडूंना संघात समावेश केला आहे. चेन्नई सुपर किंग्जचा वेगवान गोलंदाज तुषार देशपांडे यालाही संघात स्थान मिळाले आहे. संघात स्थान मिळण्यासोबतच तुषारचा बीसीसीआयने आपल्या करारात समावेश केला आहे.

एका अहवालानुसार, तुषारसह सात गोलंदाजांना वेगवान गोलंदाजीचा करार देण्यात आला आहे. यात तुषार सोबत मयंक यादवलाही वेगवान गोलंदाजीचा करार मिळाला असून आकाश दीप, विजय कुमार वैशाक, उमरान मलिक, यश दयाल, विद्वथ कवेरप्पा यांचाही या यादीत समावेश आहे.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(✱ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)